कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. ७ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## पुन्हा डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांचा पराभव केला. यानंतर फ्लोरिडामध्ये बोलताना ट्रम्प यांच्यासह एलन मस्क यांनी आपल्या संपूर्ण टीमचे आणि पत्नी, मुलांचेही आभार मानले. यावेळी ट्रम्प यांनी अमेरिकेला गतवैभव मिळवून देणार, असे आश्वासनही अमेरिकन नागरिकांना दिले. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा ऐतिहासिक विजय असल्याचे म्हटले. अमेरिकेमध्ये पहिल्यांदाच असा राजकीय बदल झाला असून, देशाला गरज असतानाच हा विजय मिळाला. मला ४७ वा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडल्याबद्दल अमेरिकन नागरिकांचे आभार, असे ते म्हणाले.

## आज खंडाळे, पेढांबेत प्रचार दौरा

**अलिबाग :** महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रेलखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या झंझावाती प्रचाराला सुरुवात झाली असून, मतदारांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. मागील दोन दिवस मुरुड मतदारसंघातील विविध गावांमध्ये जोरदार प्रचार झाल्यानंतर गुरुवारी (दि. ७) अलिबाग मतदारसंघातील खंडाळे विभागात सकाळी १० वाजता सागाव मारुती मंदिरात प्रचाराचा नारळ वाढवून शुभारंभ होणार आहे. तर, दुपारी चार वाजता पेढांबे विभागात चित्रलेखा पाटील यांचा प्रचार दौरा असणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने महाविकास आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टक्केवारी घेणाऱ्या आमदाराला घरी बसवा

## शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
हजारो कोटी रुपये आणल्याच्या बाता या आमदारांनी मारल्या आहेत. निधीची तरतूद नसताना ठेकेदारांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. दाखविलेल्या स्वप्नांमुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. ज्यांनी कामांसाठी गुंतवणूक केलेली रक्कम मिळाली नाही, तर या आमदाराच्या घरावर शेण मारतील. त्यामुळे ही घाण गेली पाहिजे, अशी टीका जयंत पाटील यांनी केली. नाना कुंटेंपासून दत्ता पाटील, खानविलकर, मधुकर ठाकूर यांनी विधानभवनात अलिबागचा सन्मान कायम ठेवला आहे. टक्केवारी घेणाऱ्या आमदाराला घरी बसवा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.



(छायाचित्र- समीर मालोदे)

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातील प्रमुख कार्यकर्त्यांची अलिबागमधील बिगस्प्लॅश हॉटेलमधील सभागृहात चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना पाठिंबा देण्यासाठी बुधवारी (दि. ६) बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ, महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई, रोह्याचे माजी नगराध्यक्ष तथा तालुका प्रमुख समीर शेडगे, पिंट्या उर्फ अमिर ठाकूर, अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक ॲड. गौतम पाटील, हेमंत पाटील, कमलेश खरवले आदींसह महिला पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी निर्माण केलेली शिवसेना फोडण्याचे काम गद्दारांनी केले. उध्दव बाळासाहेब ठाकरेंसोबत सर्व निष्ठावंत कार्यकर्ते राहिले. त्यामुळे शिवसेना पक्षाला अधिक चांगले बळ मिळाले.

अलिबाग विधान मतदारसंघात मागील निवडणुकीत ज्यांना निवडून दिले, त्या गद्दारांनी निष्ठावंत शिवसैनिकांची फसवणूक केली. ज्यांना पक्ष, जनतेशी बांधिलकी नाही, विचार, निष्ठा नाही, अशा गद्दारांना पुन्हा निवडून देऊ नका. त्यामुळे या निवडणुकीत बदलाची भावना ठेवून जिद्दीने काम करून महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना निवडून द्या, असे आवाहन •➤ पान २ वर

### गद्दारांना चिखलात लोळवा : चित्रलेखा पाटील



महाविकास आघाडीच्या बड्या नेत्यांचे बळ आणि कार्यकर्त्यांची साथ या निवडणुकीत माझ्या पाठीशी आहे, त्यामुळे हा विजय निश्चित आहे. उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना गद्दार सोडून गेले. परंतु, उध्दव बाळासाहेब ठाकरे दिल्लीसमोर कधीही झुकले नाहीत. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेतून मराठी माणसासाठी संघर्ष केला. कोरोना काळात त्यांनी चांगले काम केले. स्वतःची प्रकृती बरी नसतानादेखील महाराष्ट्रातील जनतेचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी त्यांनी काम केले. म्हणूनच एकजुटीने काम करून या गद्दारांना चिखलात लोळवायचे आहे. आमदार म्हणून निवडून आल्यावर महाविकास आघाडीतील घटक पक्षातील कार्यकर्त्याला सन्मानाची वागणूक दिली जाईल, अशी ग्वाही चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी दिली.

### चिऊताईंसाठी जोमाने काम करणार : सुरेंद्र म्हात्रे



मातोश्रीच्या आदेशानुसार या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्यासाठी काम करायचे आहे. चित्रलेखा पाटील यांना निवडून देण्यासाठी मोठ्या ताकदीने प्रत्येक कार्यकर्ता जोमाने काम करणार आहे. चाळीस हजारांहून अधिक मते देण्याचा प्रयत्न राहणार आहे. ही निवडणूक गद्दारांच्या विरोधात आहे. महाविकास आघाडीची एक ताकद अशीच ठेवून या निवडणुकीत चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना एक लाखाहून अधिक मतांनी निवडून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा, असे आवाहन उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातील जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनी केले.

### वेधक

## तरुणाची हत्या

**पनवेल :** पैशाच्या किरकोळ वादातून ३२ वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या केल्याप्रकरणी आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बेलपाडा आदिवासीवाडीमागील डोंगरावर एका अनोळखी इसमाचा मृतदेह पाण्यात पडला असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली. त्या ठिकाणी पोलिसांनी जाऊन पाहणी केली असता बाजूला आणि दगडावर रक्त पडलेले दिसत होते. मृत इसमाला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृतदेहाच्या शवविच्छेदनात त्याची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याची •➤ पान २ वर

## २८१ कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यापासून २८१ कोटी ९३ लाख रुपयांपेक्षा अधिकची मालमत्ता जप्त केल्याची माहिती बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर झारखंडमध्ये १५८ कोटी ७ लाख रुपये तर देशभरात ५५८ कोटी ६४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाने दिली. महाराष्ट्रात जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेमध्ये ७३ कोटी ११ लाख रुपये रोकड, ३७ कोटी ९८ लाख रुपयांची दारु, ३७ कोटी ७६ लाख रुपयांचे अंमली पदार्थ, ९० कोटी ५३ लाख रुपयांचे सोने-चांदी, ४२ कोटी ५५ लाख रुपयांच्या वस्तूंचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करतानाच कडक कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार कारवाई करण्यात आली.

## चेंढरेमध्ये शिंदे गटाला भगदाड


(छायाचित्र- समीर मालोदे)

### चिमणे यांचा शेकापमध्ये प्रवेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
चेंढरे ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य ॲड. रेखा चिमणे आणि अनिल चिमणे यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा शेतकरी भवन येथे बुधवारी (दि.६) छोटेखानी कार्यक्रमात पार पडला. चिमणे यांच्या पक्षप्रवेशामुळे चेंढरेमध्ये शिंदे गटाला भगदाड पडले आहे. ऐन निवडणुकीत शिंदे गटातील कार्यकर्ते शेकापमध्ये प्रवेश करू लागल्याने त्याचा फटका महेंद्र दळवी यांना बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अनिल चिमणे आणि रेखा चिमणे हे गेल्या अनेक महिन्यांपासून शिंदे गटातील शिवसेनेमध्ये कार्यरत होते. शिंदे गटाच्या मनमानी कारभाराला कंटाळून त्यांनी सोमवारी शेकापच्या कार्यप्रणालीवर खुश होऊन शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केला. नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जयंत पाटील यांनी जल्लोषात स्वागत केले.

यावेळी ॲड. परेश देशमुख, दत्ता ढवळे, ममता मानकर, प्रशांत फुलगावकर, दिनेश कवाडे, राम थळे, संजय घरत, नाना घरत, दिलीप मानकर, संदीप ढवळे, विलास म्हात्रे, नागेश वंजारे, मिथुन बेलोसकर, शरद कापसे, लक्ष्मण पवार, विरेंद्र साळवी, एस.एम. पाटील, अतुल जाधव, नरेश भैरी, मोनिष आचार्य, गणेश कुमार, संतोष जंगटी, सदीम आसम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या.

## ‘आप’चा चिऊताईंना पाठिंबा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरीकामगारपक्षाच्याअलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना आम आदमी पार्टीच्यावतीने पाठिंबा देण्यात आला. अलिबाग येथील शेतकरी भवन येथे बुधवारी (दि. ६) चित्रलेखा पाटील यांची भेट घेऊन त्यांना पाठिंब्याचे पत्र देण्यात आले.



यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, महाविकास आघाडी पुरस्कृत शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, महाराष्ट्र संघटन मंत्री डॉ. रियाज पठाण, माजी जिल्हा अध्यक्ष मनोज घरत, पनवेल विधानसभा समन्वयक जयसिंग शेरे, शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील, अवधूत पाटील, मोहन धुमाळ, नागेश कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी रियाज पठाण म्हणाले, राज्यात भ्रष्टाचारी सरकार आहे. या महायुतीच्या सरकारला पाडण्यासाठी महाविकास आघाडी पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना आम आदमी पार्टीच्यावतीने पाठिंबा देण्यात आला आहे. आम आदमी पार्टीचे सर्व कार्यकर्ते या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना सहकार्य करून या निवडणुकीत जिंकून देतील, अशी ग्वाही पठाण यांनी दिली.

यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी सांगितले, शेतकरी कामगार पक्षाचे आणि आम आदमी पार्टीचे एक वेगळे नाते आहे. आम आदमी पार्टीने पाठिंबा देऊन महाविकास आघाडीच्या उमेदवारांना बळ दिले आहे. त्यामुळे चित्रलेखा पाटील यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

## महाविकास आघाडीची महाराष्ट्रात ‘पंचसूत्री’




**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महाविकास आघाडीच्या प्रचाराचा शुभारंभ मुंबईतील बीकेसीतील सभेने झाला. ही प्रचारसभा बुधवारी (दि. ६) पार पडली. दरम्यान, महाविकास आघाडीने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी आघाडीने जाहीरनाम्यातून पंचसूत्री जाहीर करुन महाराष्ट्रातील जनतेला आश्वासने दिली आहेत. या सभेसाठी काँग्रेसचे राहुल गांधी, राष्ट्रवादीचे खासदार शरद पवार, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे उपस्थित होते.

यावेळी तिनही पक्षातील दिग्गज नेत्यांनी महाविकास आघाडीची जाहीरनामा प्रसिद्ध केला. महाविकास आघाडीने जाहीरनाम्यातून मोठ्या घोषणा केल्या आहेत. या मोफत बससेवा, शेतकऱ्यांसाठी •➤ पान २ वर

## संविधानावर संघाचा लपून हल्ला

### नागपुरातून राहुल गांधींचा हल्लाबोल

**। नागपूर । प्रतिनिधी ।**
राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पहिल्याच प्रचारसभेच्या आधी काँग्रेस नेते आणि विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी नागपूरमधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपवर हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी संविधान सन्मान संमेलनात बोलताना जोरदार टीकास्त्र सोडले. संघ संविधानावर लपूनछपून हल्ला करणार. समोरून थेट वार करण्याची हिंमत नाही. समोरुन हल्ला केल्यास त्यांचा पाच मिनिटात पराभव होईल, असे राहुल गांधी यांनी म्हटले.

राहुल गांधी बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. आपल्या दौऱ्याची सुरुवात त्यांनी नागपूरपासून केली. नागपूरमध्ये आगमन झाल्यावर त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंदन केले. त्यानंतर राहुल गांधी यांनी सुरेश भट सभागृहात आयोजित संविधान सन्मान संमेलनाला संबोधित केले. राहुल यांनी म्हटले की,



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बोलायचे तेव्हा त्यांचा आवाज हा कोट्यवधी शोषित समूहाचा आवाज होता. बाबासाहेब बोलायचे तेव्हा दुसऱ्यांचं दुःख त्यांच्या तोंडून निघत होते. जेव्हा आपण आंबेडकर, गांधींची चर्चा करतो, तेव्हा आपण एका व्यक्तीबाबत बोलत नाही असे राहुल यांनी म्हटले.

राहुल यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले की, काँग्रेस नव्हे तर देशातील जनतेने बाबासाहेबांना संविधान बनवण्यास सांगितले. देशात कोट्यवधी दलित आहेत, त्यांचे दुःख, त्यांचा आवाज या संविधानात यायला हवा अशी त्यांचे म्हणणे होते. या संविधानात •➤ पान २ वर

## अजित पवारांना अल्टिमेटम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या असताना राजधानी नवी दिल्लीत शरद पवार यांची राष्ट्रवादी विरुद्ध अजित पवार यांची राष्ट्रवादी यांच्यात सर्वोच्च न्यायालयात पक्ष आणि चिन्हाबाबत सुनावणी सुरू आहे. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाने अजित पवारांना ३६ तासांचा अल्टिमेटम दिला आहे. येत्या ३६ तासांत अजित पवारांना पक्षचिन्हाबाबत खुलासा करणारी सूचना राज्यातील वर्तमानपत्रांत छापायचे आहे. तसे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेशही दिले आहे.

न्यायालयात सुनावणीदरम्यान डिस्क्लेमरबाबत विचारणा करण्यात आली. त्यानुसार, आमच्याकडून जाहिरातीच्या प्रत्येक ठिकाणी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असा डिस्क्लेमर दिला जात आहे असे अजित पवार गटाच्या वकिलांनी सांगितले. तुम्ही प्रत्येक दिवशी येणाऱ्या जाहिरातीमध्ये हा उल्लेख करीत आहात का? अशी विचारणा न्यायालयाने केली. त्यावर दररोज नाही, मात्र गरजेच्या ठिकाणी आम्ही प्रकटीकरण देत आहोत, असे अजित पवार गटाने सांगितले. त्यावर पुढच्या २४ ते ३६ तासांमध्ये प्रकटीकरण देणे अनिवार्य असेल, असे निर्देश न्यायालयाने दिले.



### मिनीट्रेन आली रुळावर; पर्यटक प्रवाशांचा मोठा प्रतिसाद

# माथेरानच्या पर्यटन हंगामाला सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
ब्रिटिश काळात सुरू झालेली नेरळ-माथेरान-नेरळ ही नॅरोगेजवर चालविली जाणारी मिनीट्रेन बुधवार, दि. ६ नोव्हेंबरपासून पर्यटकांच्या सेवेत आली. मिनीट्रेन नेरळ-माथेरान-नेरळदरम्यान दोन फेऱ्या मारणार आहे. तब्बल २० दिवस उशिरा पर्यटक प्रवाशांचे सेवेत येत आहे. नेरळ येथून मिनीट्रेनचा पर्यटन हंगाम सुरू होत असल्याने नेरळ येथील रेल्वे अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून गाडीची पूजाअर्चा करण्यात आली.

नेरळ जंक्शन स्थानकातून नेरळ माथेरान नेरळ मिनीट्रेनचा पर्यटन हंगाम सुरू झाला. पावसाळ्यात चार महिने सुट्टीवर असलेली मिनीट्रेन १५ ऑक्टोबर रोजी सुरू होते. यावर्षी नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन मार्गावर दुरुस्तीचे कामे सुरू असल्याने नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे यावर्षी मिनीट्रेनचा नवीन हंगाम सुरू झाला नव्हता. यावर्षी दिवाळी सण उशिरा असल्याने मिनीट्रेन उशिरा सुरू होत असल्याने पर्यटकदेखील मिनीट्रेनची प्रवासी वाहतूक सुरू होण्याची वाट पाहात होते. बुधवारी सहा नोव्हेंबर रोजी मिनीट्रेनची वाहतूक सुरू झाली. त्याआधी नेरळ जंक्शन स्थानकात मिनीट्रेनच्या इंजिनाची पूजा करण्यात आली. या नॅरोगेज मार्गावर काम करणारे सर्व कर्मचारी यांच्याकडून पूजा करण्यात आल्यानंतर मिनीट्रेनला नेरळ स्थानक प्रबंधक जी.वाय. •➤ पान २ वर





### भाग्यवान प्रवासी पुण्यातील

जाकीर तांबोळी हे पुणे येथील पर्यटक नेरळ येथे पर्यटनासाठी आले होते. त्यांना मिनीट्रेन सुरु होणार याची माहिती होताच माथेरान जाण्याचा प्लॅन त्यांनी केला. त्यानंतर पहाटे साडेचार वाजता जाकीर यांचे मातोश्री या पहाटे साडेचार वाजता नेरळ स्थानकात येऊन बसल्या होत्या. सकाळी आठ वाजता तिकीट खिडकी उघडल्यानंतर जाकीर तांबोळी यांनी आपल्या कुटुंबासाठी मिनीट्रेन प्रवासाची तिकिटे मिळविली. या कुटुंबाने मिनीट्रेनमधील सलोन डब्याची तिकिटे मिळविली. त्या प्रवासी डब्यातून केवळ पाच प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे तांबोळी यांनी आमचे कुटुंब मिनीट्रेन प्रवास एन्जॉय केला.

## मच्छिमार बांधवांनी मतदानाचा हक्क बजावावा

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन

**। अलिबाग । वार्ताहर ।**
बुधवार, दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी सात ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे मतदान संपन्न होणार असून, रायगड जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांनी, नौका मालकांनी, नौकेच्या तांडेल, नौकेचे खलाशी, ओली व सुकी मासळी विक्री करणाऱ्या महिला-भगिनी, जाळे विणणारे मच्छिमार, हाताने मासे पकडणारे मच्छिमार, गावातील सर्व मत्स्यसंवर्धक व जलाशयात मासेमारी करणाऱ्या सर्व मच्छिमारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी किशन जावळे केले. जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नितीन वाघवारे, सहायक आयुक्त, मस्त्यव्यवसाय संजय पाटील आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्याला १२२ किलोमीटरची •➤ पान २ वर

## जंगल जेट्टीवरुन टेम्पो उलटला

**।आगरदांडा/कोर्लई।प्रतिनिधी।**
मुरुड आगरदांडा येथील जंगल जेटीवर बुधवारी (दि. ६) सकाळी आठच्या फेरीबोटीला जाण्यासाठी आलेल्या पाणी बॉटल वाहतूक करणारा पिकप टेम्पो तीव्र उतारामुळे चालकाच्या नियंत्रणात न राहिल्याने फेरी बोटीवर चढण्याआधीच जेटीवरून समुद्रात कोसळला. या अपघाताच्या वेळी चालक टेम्पो उडाल्यानंतर सुखरूप बाहेर आला. त्यामुळे जीवितहानी झाली नाही. समुद्राचे पाणी प्यायलामुळे •➤ पान २ वर



# पर्यटकांची लूट थांबवा अन्यथा जनआंदोलन

## ■ प्रवासी संघटनेच्या अध्यक्षांचा मेरीटाइम बोर्डाला इशारा

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**
**जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून मोठ्या बससाठी ३०० रुपये, मिनी बससाठी २०० रुपये व छोट्या कारसाठी १०० रुपये आकारले जातात. हा खर्च फक्त गाडी पार्किंगचा झाल्यावर राजपुरी येथील प्रवेश द्वाराजवळ ग्रामपंचायतीचा कर पावती भरावी लागते. तद्नंतर बोटीचा खर्च,पुरातत्व खात्याच्या किल्ला पहाण्याचे तिकीट असा मोठा खर्च पर्यटकांना सहन करावा लागत आहे.**



वाहन पार्किंगचे पैसे मोठ्या प्रमाणात असून, हे पैसे तातडीने कमी करण्यात यावे अन्यथा प्रवासी लोकांना सोबत घेऊन मोठे जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा मुरुड तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी दिला आहे.

ते वाहन पार्किंगच्या अनधिकृत ठेक्याबाबत विशेष माहिती देताना पत्रकारांशी संवाद साधत होते. यावेळी सुर्वे यांनी सांगितले की, महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने वाहन पार्किंगचा ठेका देताना यासाठी १० निविदाधारक होते. परंतु प्रत्यक्ष टेंडर फोडताना कोणालाही न बोलावता केवळ राजकीय दबावापोटी बोगस प्रक्रिया करून मर्जीतील लोकांना देण्यात आले आहे. बोगस टेंडरबाबत प्रवासी संघटनेची तक्रार असूनसुद्धा दुसऱ्या व्यक्तीस टेंडर देण्यात आले आहे. वाहन पार्किंगचे दर मोठ्या प्रमाणात घेतले जात असून, पर्यटकांचा खिसा रिकामा करण्याचा डाव आपण कदापि यशस्वी करू देणार नाही, असा इशारासुद्धा यावेळी देण्यात आला आहे. वाहन पार्किंगचे दर जर महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाने दिले असतील तर प्रत्येक तिकिटावर मेरीटाइम बोर्डाचा शिक्का आवश्यक आहे. वाहन पार्किंगच्या तिकिटावर पर्यटकांकडून जीएसटी कर आकारला जात आहे. जर संबंधित ठेकेदार खरोखर जीएसटी भरत असेल, तर त्याने आपला जीएसटी नंबर जाहीर करावा तसेच आतापर्यंत किती जीएसटी रक्कम शासनाकडे जमा केली याचा तपशीलसुद्धा देण्यात यावा, असे आवाहन सुर्वे यांनी केले आहे.

वाहन पार्किंगच्या बोगस प्रकरणात महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाचे मोठे अधिकारी यांचे स्वारस्य असल्याचा आरोपसुद्धा यावेळी त्यांनी केला आहे. वाहन पार्किंगच्या ठेक्यामध्ये सामील असणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल खातेनिहाय चौकशी करा याबाबत निवेदनसुद्धा दिले असल्याची माहिती श्रीकांत सुर्वे यांनी दिली आहे. शासनाचे करोडो रुपये वाया घालवणारे कार्यकारी अभियंता देवरे यांची लवकरात लवकर खातेनिहाय चौकशी सुरु करा अन्यथा प्रवासी संघटनेकडून मोठे जनआंदोलन छेडले जाईल असा इशारा सुर्वे यांनी दिला आहे.

# मच्छिमार बंपर मासळीच्या प्रतीक्षेत

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

समुद्राला उधाण सुरू झाले असून सीझन असला तरी मुरूड, राजपुरी, एकदरा, बोर्ली च्या समुद्रात मच्चीमारांना बंपर मासळी मिळत नाही. छोटी पापलेट, टायनी कोलंबी आणि चैती कोलंबी काही प्रमाणात मिळत आहे तर स्वादिष्ट आणि प्रसिद्ध शेवंड मासळीचा हंगाम डिसेंबरपासून सुरू होईल, अशी माहिती राजपुरी येथील ज्येष्ठ मच्छिमार धनंजय गिदी आणि एकदरा येथील नाखवा रोहन निशानदार यांनी दिली. सध्या कोलंबी मिळत आहे; मात्र बंपर असा काही प्रकार दिसत नाही. कोलंबीचे सोडे १६००/- ते १८००/- किलो दराने विकले जात आहेत.

श्री गिदी म्हणाले की मोठी साईझ असणाऱ्या पापलेट मासळीला मुंबईत मागणी असून उत्तम भाव मिळतो. २०० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाची पापलेटची विक्री जलद होत असते. सध्या छोटी पापलेट आणि कोलंबी स्थानिक मार्केटमध्ये विक्रीस नेली जात आहे. काही अन्य भागातून सुरमईसारखी मासळी काही प्रमाणात



येत आहे. परंतु, मासळीचा बंपर प्रकार मात्र दिसत नाही. रोहन निशानदार म्हणाले की, अलिबाग आदी बाहेर गावाहून सुरमई, बोंबील तर दिघी बंदरातून बांगडे मासे मुरूडकडे विक्रीस येत आहेत. समुद्रात काही ठिकाणी जेलिफिश मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. परंतु, टायनी आणि चैती कोलंबी नौकांना मिळत असल्याचे मच्चीमारांनी सांगितले मात्र बंपर चे प्रमाण अजिबात नाही असे रोहन निशानदार यांनी स्पष्ट केले.

कोलंबीचे ताजे आणि कातळावर सुकविलेले सोडे राजपुरी, एकदरा गावातून विक्रीस येत आहेत. असे ताजे सोडे चवीला खूप चविष्ट लागतात. पर्यटकांना असे सोडे खूप आवडतात. मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, नाशिक भागातून आलेले पर्यटक ताजे सोडे घेण्यासाठी मासळी मार्केटमध्ये गर्दी करताना दिसून येतात. कोलंबी बिर्याणी, सोडे मसाला रस्सा, फ्राय सोडे, पोहे सोडे, सोडे भात, कुरकुरीत भाजून देखील सोडे मेजवानी केली जाते. उपलब्ध ओल्या मासळीचे दर गगनाला भिडल्याने सर्व सामान्य नागरिकांना घेणे परवडत नाही. पर्यटकांना देखील धक्का बसतोय. त्यामुळे सुक्या मासळी घेण्यासाठी अनेकजण वळत आहेत.९ नोव्हेंबरपर्यंत शालेय सुट्टी असल्याने या आठवड्यात देखील पर्यटकांची वर्दळ कायम राहील असे दिसून येत आहे. मुरूड, श्रीवर्धन, दिवेआगर, हरिहरेश्वर, काशीद, नांदगाव, परिसरातील समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलून गेलेले आहेत; मात्र ताजी ओली मासळीचे प्रमाण कमी असल्याने मासळीसाठी येणाऱ्या खवय्यांचा हिरमोड होताना दिसतोय.

# महिनाभरात ४० जणांना विंचूदंश

**। तळा । वार्ताहर ।**

सध्या सर्वत्र भातशेती पिकून तयार झाली असल्याने भातकापणीचा हंगाम सुरू झाला आहे. मात्र, भातकापणीच्या हंगामात विंचूदंशाच्या घटनेतदेखील वाढ झाली असून, महिनाभरात जवळपास ४० जणांना विंचूदंश झाल्याची घटना घडली आहे.

यावर्षी परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. लांबलेल्या पावसामुळे भातकापणीला उशिरा सुरुवात झाली असून, कधीही पाऊस कोसळत असल्यामुळे घाईघाईनेच भातकापणी



केली जात आहे. परंतु, भातकापणी करताना अनेकदा बेसावध असल्यामुळे विंचूदंशाचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे भातकापणी करताना नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे गरजेचे आहे. ज्यामध्ये शेतात काम करताना पायात गमबूट वापरणे, हातात रबरी हॅन्डग्लोज घालणे, डोक्यात टोपी घालणे यांसारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. तसेच ग्रामीण भागात बहुतांश वेळा विंचू दंश झाला तर त्याला सुरुवातीला मांत्रिकाकडे विष उतरविण्यासाठी नेण्यात येते. मात्र, यामुळे उशीर होऊन वेळप्रसंगी त्या रुग्णाच्या शरीरात विष पसरले जाऊन जीवितास धोका निर्माण होतो. त्यामुळे विंचूदंश झाल्यास रुग्णाला उपचारासाठी त्वरित जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करावे जेणेकरून वेळेवर उपचार झाल्याने त्या रुग्णाचे प्राण वाचतील, असे आवाहन डॉक्टरांकडून करण्यात येत आहे.

# निवडणूक निरीक्षकांकडून केंद्रांची पाहणी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात सुरु आहे. अलिबाग विधानसभा मतदारसंघ १९२ च्या निवडणूक निरीक्षक (सामान्य) रुही खान यांनी मतदारसंघातील प्रमुख मतदान केंद्रे आणि निवडणूक संबंधित यंत्रणांना बुधवारी (दि. ६) भेट दिली. यावेळी केंद्रांची पाहणी करुन आवश्यक त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले.

आगामी निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेणे आणि सर्व व्यवस्था भारतीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतात, याची खात्री करणे, हा या भेटीचा उद्देश होता.

निवडणुकीसाठी मतदान केंद्र



म्हणून निश्चित करण्यात आलेल्या सर्व शाळा, महाविद्यालय यांना त्यांनी बुधवारी भेट दिली. यावेळी त्यांनी मतदारांसाठी उपलब्ध पायाभूत सोयी आणि सुविधांचा आढावा घेतला. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे व्यवस्था केली असल्याची खात्री करून घेतली. विशेषतः दिव्यांग मतदारांसाठी सुलभ व्यवस्थापन याची पाहणी केली. मतदान प्रक्रियेदरम्यान सुव्यवस्था राखण्यासाठी मतदारांसाठी सुरळीत प्रवेश, मार्गदर्शक सूचना, दिशादर्शक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती याबाबत त्यांनी माहिती घेतली. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील ज्या मतदान केंद्रावर ७५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होईल, त्या बीएलओला विशेष सन्मानित करण्यात येईल, असे रुही खान यांनी यावेळी जाहीर केले. निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी निःपक्षपाती आणि सतर्क राहावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून

## टक्केवारी घेणाऱ्या आमदाराला घरी बसवा : जयंत पाटील

जयंत पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले, महाविकास आघाडीत शेकाप, शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस व इतर घटक पक्ष आहेत. एकत्रित काम केले तर सव्वा लाखाहून अधिक मते चित्रलेखा पाटील यांना मिळतील, असा विश्वास आहे. ज्यांनी पक्ष बदलला, ज्यांनी खोके घेतले, त्यांच्याबद्दल प्रचंड नाराजी आहे. नागररिकांमध्ये तीव्र संताप आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीला मते देऊन ते गद्दारांबद्दल राग नक्की व्यक्त करतील.

अलिबागचा आमदार म्हणून विधानसभेत एक वेगळा सन्मान आहे. संपूर्ण महाराष्ट्र अलिबागच्या आमदारांकडे एक वेगळ्या नजरेने पाहतो. परंतु, या आमदाराने पाच वर्षांत विधानसभेत एकही प्रश्न मांडला नाही. साधी आमसभादेखील घेतली नाही, त्यामुळे स्वतःचे हित साधणाऱ्या या आमदाराला घरी बसवा, असा टोला महेंद्र दळवी यांचे नाव न घेता लगावला.

चित्रलेखा पाटील या शेतकरी कामगार पक्षाच्या असल्या तरी महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार आहेत. एक उच्चशिक्षित, विविध क्षेत्रात काम करणारी कर्तृत्ववान महिला म्हणून त्यांची ख्याती आहे. जनतेचे प्रश्न मांडून ते सोडविण्याची त्यांच्यामध्ये ताकद आहे. कला, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रातील घटकाला न्याय देण्याचे काम त्या नक्की करतील. एक प्रभावी आमदार म्हणून त्यांचे काम विधानसभेत नक्कीच उल्लेखनीय राहील, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

**चित्रलेखा पाटील यांना निवडून देणार : शेडगे**

मातोश्रीवरून आदेश आल्यावर शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता काम करतो. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना उमेदवारी मिळाली आहे. पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार या निवडणुकीत कार्यकर्ते जोमाने काम करून चित्रलेखा पाटील यांना निवडून देतील. महाविकास आघाडीसाठी अलिबाग विधानसभा मतदारसंघात चांगले वातावरण आहे, असे प्रतिपादन उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे रोहा तालुका प्रमुख तथा माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांनी केले.

## जंगल जेट्टीवरुन टेम्पो समुद्रात उलटला

चालकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तो सुखरूप असल्याचे समजते.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुरुड शहरातील मुसव्विर जमादार यांच्या मालकीचा पिकअप टेम्पो क्रमांक एम एच.०६ बीजी ०२४३ यावर सिध्दी मोहल्ला मुरुड येथील चालक सफैअली सनावर सैयद १५० पाण्याच्या बॉक्सने भरलेला टेम्पो घेऊन दिघी येथे जाण्यासाठी सकाळी ७.३० वाजता निघाला. आगरदांडा जेट्टीवर आल्यावर त्याचा सहकारी रमीझ हादादी, रा. दिघी हे दोघेजण टेम्पोत बसून सकाळी ८ वाजता निघाणारी सुर्वण दुर्ग या जंगलजेटीत आपला पिकप टेम्पो रिव्हर्स मारतेवेळी चालक सफैअली सनावर सैयद याला जेट्टीवर असणाऱ्या शेवाळीचा अंदाज न आल्याने त्याचा टेम्पोवरील ताबा सुटला आणि थेट खोल समुद्रात पटली झाला. चालक व सहकारी यांनी ताबडतोब टेम्पोचा दरवाजा उघडला आणि पोहत किनाऱ्यावर आले. परंतु, नाका तोंडात पाणी शिरल्याने चालक बेशुद्ध झाल्यावर मुरुड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबतची माहिती मिळताच मुरुड पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पुढील तपास सुरू आहे.

शासनाने श्रीवर्धन तालुका व मुरुड तालुका जोडण्यासाठी आगरदांडा ते दिघी अशी फेरीबोट व्यवस्था सुरू केली आहे. यासाठी आगरदांडा येथे बांधण्यात आलेल्या जेटीला तीव्र उतार असल्यामुळे मालवाहतूक करणारी अवजड वाहने चालकाच्या नियंत्रणात राहात नाहीत, त्यामुळे हा अपघात झाला असल्याची चर्चा स्थानिक व इतर वाहनचालकांकडून होत आहे. या जेटीमुळे दुचाकी, इतर चारचाकी वाहने चालविताना वाहनचालकांना कसरत करावी लागते, त्यामुळे शासनाने ही लाखो रुपये खर्चून बांधलेली जेटी निष्फळ ठरली आहे. तरी लवकरात लवकर सुसज्ज जेटी उभारावी, अशी मागणी वाहन चालक व स्थानिकांनी तसेच फेरीबोट चालक मालक यांच्यावतीने करण्यात आली आहे.

## संविधानावर संघाचा लपून हल्ला

फुले, आंबेडकर आणि गांधी यांचा आवाज आहे. आपण संरक्षण करतोय ते हजारो वर्षे जुने पुस्तक आहे. देशात आम्ही एक दुसऱ्यांचा आदर करणार, असे म्हटले आहे. यात कुठे लिहिलं नाही एक व्यक्ती देशातील धन, भविष्य घेऊ शकेल. यात लिहिले की इथे समानता आहे.

भाजप, संघ या संविधानावर आक्रमण करत आहे. त्यांचा हा हल्ला देशाच्या आवाजावर हल्ला असल्याचे राहुल यांनी सांगितले. संविधानामुळे निवडणूक आयोग आणि इतर संस्था निर्माण झाल्या आहेत. संघ संविधानावरून समोरून हल्ला करू शकत नाही. समोरून वार केल्यास ते पाच मिनिटात हरतील, हे त्यांना ठाऊक आहे आणि म्हणूनच हे लपून हल्ला करतात. विकास, प्रगती अर्थव्यवस्था अशा शब्दांच्या आडून येतात आणि संविधानावर हल्ला करतात, अशी घणाघाती टीका राहुल गांधी यांनी केली.

## मच्छिमार बांधवांनी मतदानाचा हक्क बजावावा

सागरी किनारपट्टी लाभलेली आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्हा हा चांगल्या पर्जन्यमानाचा जिल्हा असल्यामुळे येथे गोड्या पाण्याची तळी, तलाव, जलाशय इत्यादी अस्तित्वात आहेत. मतदानाच्या दिवशी मतदान करुनच नौका मासेमारीसाठी समुद्रात नेण्यात यावी, त्याचप्रमाणे सागरी मासेमारी सफरीचे नियोजन करावे. मच्छिमारी हा रायगड जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय असून, जिल्ह्यात ४ हजार ५०० नौका आहेत. यामुळे २५ हजारांपेक्षा जास्त लोकांना थेट रोजगार मिळत आहे. गावातील सागरी मासेमारीसाठी गेलेल्या नौका मतदानाच्या दिवशी बंदरात आणाव्यात जेणेकरुन त्यावरील तांडेल, खलाशी इत्यादींना मतदान करता येईल. मतदानाची टक्केवारी वाढावी तसेच लोकशाही बळकट व्हावी, याकरिता सर्वांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या उत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले.

## माथेरानच्या पर्यटन हंगामाला सुरुवात

पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून नवीन हंगाम सुरू झाला. त्यावेळी नेरळ लोको कार्यशाळेमधील अभियंते संजीवकुमार यादव, शुभम गुप्ता, एस.के. गुप्ता, अनिल कुमार, के.जी. विनोद, पीडब्ल्यूआय शरद सानप, तर तिकीट बुकिंग म्हणून प्रेमचंद आणि बिर्जून कुमार यांनी काम पाहिले. शुभारंभ कार्यक्रमासाठी सर्व कर्मचारी उपस्थित होते.

मिनीट्रेन नवीन हंगामाचे सकाळी आठ वाजून ५० मिनिटांनी सुटलेल्या पहिली ट्रेनचे सारथ्य मोटरमन ठाणगे आणि सहायक मोटारमन हाबले यांनी केले. तर गार्ड म्हणून सचिन पाटील यांनी, तर तिकीट तपासनीस म्हणून एस.जी. भगत यांनी कामकाज पाहिले. या पहिल्या मिनीट्रेनसाठी लावण्यात आलेले सर्व चारही प्रवासी डब्बे प्रवाशांनी फुल्ल झाले होते. त्यात प्रथम श्रेणी डब्यातून १६ आणि द्वितीय श्रेणी डब्यातून ९० पर्यटक प्रवासी केला. तर, सलोन या डब्यातून पाच प्रवाशांनी १६५० रुपये खर्चून तिकीट मिळवले होते. सकाळी दहा वाजून २५ मिनिटांनी सुटलेल्या दुसऱ्या ट्रेनमधूनदेखील प्रवासी पर्यटकांची गर्दी होती आणि ती गाडीदेखील हाऊसफुल्ल चालली.

**गाडीला एसी डब्बा नाहीच**

नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर दररोज सकाळी आठ वाजून ५० मिनिटांनी सोडल्या जाणाऱ्या मिनीट्रेनसाठी १६ प्रवासी यांच्यासाठी असलेला वातानुकूलित प्रवासी डब्बा लावला जातो. मात्र, या पहिल्या गाडीसाठी वातानुकूलित डब्बा लावण्यात आला नव्हता.

## पैशांच्या किरकोळ वादातून तरुणाची हत्या

ओळख पटवली. यावेळी विकास रामलाल बोरा हा ३० ऑक्टोबर रोजी कमल या मित्रासोबत सीएसटी येथे जातो असे सांगून गेला व तो घरी परत न आल्याने नेहरूनगर पोलीस ठाणे, कुर्ला येथे तो हरवल्याची तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार पोलीस तपास करत असताना विकास बोरा याचा मित्र कमल ढोलपुरीया (ठक्कर बाप्पा कॉलनी पाडा नंबर दोन कुर्ला पूर्व) याला चौकशीसाठी ताब्यात घेतले व त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने पैशांच्या किरकोळ वादातून विकास बोरा याला दगडाने ठेचून मारले असल्याची कबुली दिली आणि त्याचा मोबाईल फोन फेकून दिला.

## महाविकास आघाडीची महाराष्ट्रात ‘पंचसूत्री’

तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्जमाफ तसेच नियमित कर्जफेडीसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन, जातनिहाय जनगणना करणार, ५० टक्के आरक्षण मर्यादा हटवण्यासाठी प्रयत्नशील, बेरोजगार तरुणांना ४ हजार रुपयांपर्यंत मदत अशा मोठ्या योजनांचा समावेश आहे.

**काय आहे पंचसूत्री?**

महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला ३००० रुपये तसेच महिला व मुलींना मोफत बस प्रवास. शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्जमाफ तसेच नियमित कर्जफेडीसाठी ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन. जातनिहाय जनगणना करणार, ५० टक्के आरक्षण मर्यादा हटवण्यासाठी प्रयत्नशील. २५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा व मोफत ओषधे. बेरोजगार तरुणांना दर महिन्याला ४००० रुपयांपर्यंत मदत. आगामी काळात जनतेने महाविकास आघाडीला सर्वाधिक मतदान करुन सरकार स्थापन करुन दिलं तर महाविकास आघाडीचं सरकार राज्यात या पाच योजना जाहीर करणार असल्याचे आश्वासन यावेही देण्यात आले.

## स्वयम शिर्के बनला सीए

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील पाली येथील स्वयम निलेश शिर्के याला सीए फाऊंडेशन प्रवेश परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात घवघवीत यश मिळाले आहे.



देशातील कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेपैकी सीएची परीक्षा आहे. ज्याप्रमाणे सीएची परीक्षा कठीण समजली जाते त्याचप्रमाणे सीए फाऊंडेशन परीक्षा सुधा कठीण आहे. आज या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, भारतातील १९.६७% निकाल जाहीर झाला. या परीक्षेत सुधागड तालुक्यातील पाली येथील स्वयंम शिर्के याने यश मिळवले. हा विद्यार्थी रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे या शाळेचा विद्यार्थी असून, सन २०२३-२४ बारावी कॉमर्समधून चांगल्या गुणांनी पास झाला आहे.

# रेल्वे स्थानकातील उद्वाहन काम सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ स्थानकात नव्याने मेक ओव्हर केला जात आहे. त्यात फलाट एक वर प्रवाशांचा सोयीसाठी उद्वाहन बनविले जात आहे. नेरळ स्थानकात यापूर्वीपासून फलाट दोनवर उद्वाहन कार्यरत आहे.

नेरळ स्थानकाचे मेक ओव्हर केले जात आहे. त्यात नव्याने स्काय वॉक बनविला जात आहे. त्याच स्काय वॉक यांना जोडणारे दोन पादचारी नेरळ स्थानकात उभे राहिले आहेत.त्याचवेळी आणखी एक पादचारी पूल नेरळ स्थानकात फलाट एकवर उभारला जात आहे. त्याच नवीन पादचारी पुलाच्या बाजूला उद्वाहन यंत्रणा बसविली जात आहे. नेरळ स्थानकात याआधी फलाट दोनवर उद्वाहन यंत्रणा कार्यरत आहे. त्यामुळे



फलाट एकवरदेखील उद् वाहन यंत्रणा बसविण्यात यावी, अशी नेरळ प्रवासी संघटना अनेक वर्षे मागणी करीत आहे.

# शेतकऱ्यांची दिवाळी गोड

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका शेतकरी संघटनेच्या वतीने खास शेतकऱ्यांसाठी दिवाळी फराळ वाटप करण्याचा कार्यक्रम तालुक्यातील कुणबी भवन येथे आयोजीत करण्यात आला होता. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई, तळा पंचायत समितीचे वतीने पाटील, वनपाल विलास तांबे, बँक ऑफ इंडिया शाखा प्रबंधक, स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा प्रबंधक, तळा तालुका पत्रकार संघटना, व्यापारी असोसिएशन तळा, रायगड जिल्हा बँकमॅने जर, बँक निरिक्षक, तालुका कृषी विभाग प्रतिनिधी, तसेच शेतकरी संघटना अध्यक्ष चंद्रकांत राऊत, उपाध्यक्ष रवी मांडवकर सचीव कैलास पायगुडे उपस्थित होते.

तालुक्यात प्रथमच या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बळीराजाला शेती कापणीच्या कामात व्यस्त असल्याने त्याचा संपूर्ण दिवस शेताच्या बांधावर जातो.दिवाळी फराळाचा सण साजरा करता यावा या उदात्त हेतूने ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सर्व सामान्य



जनतेची आनंदाने सण साजरा करु शकतो. या निमित्ताने दिवाळीचा फराळ जगाच्या पोशिंद्या साठी शेतकरी संघटनेकडून आगळ्या वेगळ्या कार्यक्रम घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. या माध्यमातून शेतकरी संघटना व शेतकऱ्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेऊन प्रशासनाकडे पोहचवून प्रयत्न केला जाणार आहे. हि संकल्पना शेतकरी संघटनेने आखून जिल्ह्यात तळा तालुका शेतकरी संघटनेने आदर्श ठेवला आहे. या आनंददायी दिवाळी फराळ करताना शेकऱ्यांचा आनंद द्विगुणित झाला होता. यावेळी तालुक्यातील जवळपास १५० च्या वर शेतकरी सहभागी झाले होते.

# भातकापणीमुळे बाजारपेठेत शुकशुकाट

**। तळा । वार्ताहर ।**

परतीच्या पावसामुळे यावर्षी भातशेतीचे काही प्रमाणात नुकसान झाले असून गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघाडी दिली असल्याने तालुक्यातील बळीराजा भातकापणीच्या कामात व्यस्त झाला आहे. याचा परिणाम बाजारपेठेवर झाला असून, बाजारपेठ परिसरात शुकशुकाट पसरला असल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

गेल्यावर्षी तळा तालुक्यात २१०० हेक्टरवर भातशेतीची लागवड करण्यात आली होती. मात्र यावर्षी ती कमी होऊन १६०० हेक्टरपर्यंतच भात लागवड करण्यात आली आहे. परतीच्या पावसामुळे ४९ हेक्टरपर्यंत पिकाचे नुकसान झाले



आहे. लहरी पावसाचा भरोसा नसल्यामुळे तळा तालुक्यात शेतकरी वर्गाची भात कापणीची लगबग सुरू झाली असून, तालुक्यातील शेतकरी वर्ग भात कापणीच्या कामात मग्न झाला आहे. मात्र यावर्षी मजुरीत वाढ झाली असल्याने वाढलेल्या मजुरीचा फटका बळीराजाला बसला आहे. भात कापणीला मजुरांचीदेखील कमतरता जाणवत असून, पावसामुळे भात भिजण्याची शक्यता असल्याने मिळेल ती मजुरी देऊन लवकरात लवकर भात कापणी केली जात आहे. तालुक्यातील शेतकरी भात कापणीच्या कामात गुंतला असल्याने बाजारपेठेतदेखील शुकशुकाट पसरला आहे.

निवडक

### आदिवासींसोबत भाऊबीज

**पनवेल :** आदर्श सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गजानन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी भाऊबीज सोहळा आयोजित करण्यात येतो. यावेळी या सोहळ्यात सहाय्यक आयुक्त काळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी आदिवासी महिलांना साडी, फराळ, मिठाई तसेच मुलांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. यावेळी गणेश पेडामकर, मेघनाथ ठाकूर, संतोष राठोड, मनेश पाटील, वुणाल ठावूर, रवी कातकरी, आदि उपस्थित होते.

### पाच लाखांची चोरी

**पनवेल :** दुकानाच्या गल्ल्यात ठेवलेल्या ५ लाख ९७ हजसा रोख रकमेची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. इस्माईल हजारी यांचे पनवेलमध्ये गुजरात साडी सेल नावाचे साडीचे दुकान आहे. त्यांचा मुलगा मोहम्मद हा सकाळी दुकानावर गेला असता दुकानात चोरी झाल्याचे आढळून आले. यावेळी इस्माईल हे दुकानात आले आणि त्यांनी गल्ल्यात ठेवलेले पैसे पाहिले असता ते दिसून आले नाहीत. याप्रकरणी चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सोन्याचे मंगळसूत्र खेचले

**पनवेल :** रस्त्याने चालत जात असलेल्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून ते चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विजय लक्ष्मी नायर आणि गोपाल कृष्ण नायर हे खारघर येथे राहत असून ते सेक्टर २१ येथील दुकानात सामान घेण्यासाठी गेले होते. ते पायी चालत जात असताना कल्पतरू हॉस्पिटलकडे जाणाऱ्या चौकात उभ्या असलेला इसमाने विजयालक्ष्मी नायर यांच्या गळ्यातील २४ ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र खेचले आणि तो पळून गेला.

### दुकान मालकाविरुध्द गुन्हा

**पनवेल :** उलवे सेक्टर-१७ मधील जावळे गावातील श्री हनुमान सुपर मार्केट या किराणा स्टोअरमध्ये ३० ऑक्टोबर रोजी सिलेंडरचा स्फोट होऊन चौघांचा मृत्यू तर एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. या घटनेतील मृत रमेश भाटी याने त्याच्या किराणा दुकानामध्ये विक्रीसाठी अवैधरित्या आणि बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेला पेट्रोल, डिझेल आणि गॅस सिलेंडरचा साठा निष्काळजीपणे हाताळण्यात आला होता. यामुळे उलवे पोलिसांनी भाटी यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### सोन्याच्या चैनीची चोरी

**पनवेल :** येथील सोन्याच्या दुकानात रवी घुले नावाची व्यक्ती दुकानात आला आणि त्याने सोन्याची चैन दाखवण्यास सांगितली. एक चैल पसंत केली. यावेळी घुले याने ही चैन तुमच्या माणसासोबत पाठवून द्या त्याच्याकडे एक लाख रुपये देतो आणि बाकीचे गुगल पे करतो असे सांगितले. यावेळी दुकानातील सुनील सुखवाल हे तीन तोळे वजनाची चैन घेऊन त्यांच्या सोबत गेले. काही वेळाने रवी घुले यांनी सुनील याच्या हातातील सोन्याच्या चैनची पिशवी हिसकावली आणि कळंबोलीच्या दिशेने पळून गेले.

चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराचा झंझावात

# आमदारांचा घेतला खरपूस समाचार










**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभेच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांनी मुरूड तालुक्यात मंगळवारी (दि.५) झंझावाती प्रचाराचा दौरा केला. या प्रचारात त्यांनी गाव बैठकीवर जोर दिला आहे. यावेळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी आ. दळवी यांचा खरपूस समाचार घेतला आहे.

अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा निवडणुक प्रचाराचा शंखनाथ महाविकास आघाडीने केला असून मुरूड तालुक्यातील चोरढे, तळेखार, वळके, मिठेखार, काशीद, भोईघर, कोर्लाई, बोर्ली, मांडला, काकळघर येथे चित्रलेखा पाटील यांनी गाव बैठकीच्या स्वरूपात सभा घेतल्या. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्यावर टिकास्त्र सोडत विद्यमान आमदार हे निष्क्रिय आमदार म्हणून हेटाळणी केली आहे.

पुढे बोलताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, तालुक्यातील महिला या महागाईने तर युवक बेरोजगारीने ग्रासलेला असून ही सध्याची गंभीर परिस्थिती आहे. येथील प्रत्येक कारखाना गुजरातमध्ये जात आहे. असे असतानाही विद्यमान आमदार हे चिखलात लोळत मज्जा घेत आहेत. ही मोठी शोकांतीका आहे. यामुळेच उध्दव ठाकरे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्याचा व महाराष्ट्रात महाविकास आघाडीची सत्ता स्थापन करण्याचा मानस आहे. यामुळे गद्दारांना





चिखलात लोळविण्यासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मत देणे ही काळाची गरज असल्याचे आवाहन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी केले आहे. यावेळी उबाठा शिवसेनेचे किशोर काजारे व राजश्री मिसाळ यांनी सुद्धा उपस्थितांना मार्गदर्शन केले व चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना निवडून आणण्याचे आवाहन केले आहे.

यावेळी शेकापचे ॲड. गौतम पाटील, माजी जि.प.सदस्य द्वारकानाथ नाईक, वामन चौलकर, विजय गिदी, अल्पसंख्याक पदाधिकारी रिझवान फहीम, माजी सरपंच चेतन जावसेन, उबाठा गटाच्या माजी जि.प. सदस्या राजश्री मिसाळ व युवासेना तालुका अध्यक्ष किशोर काजारे तसेच शेकापसह शिवसेना उबाठोचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# स्नेहल जगतापांचा गोगावलेंविरोधात एल्गार



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाड विधानसभा मतदार संघातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तसेच महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार स्नेहल जगताप-कामत यांनी 'जीत हो या हार हो, मुकाबला टक्करका होना चाहिये. अब मुकाबला टक्करका होगा. और जीतभी हमारी होगी'. अशा शब्दांत महाड विधानसभा मतदार संघातील शिवसेना आ. भरत गोगावले यांच्याविरोधात यल्गार पुकारला आहे.

पोलादपूर तालुक्यातील माटवण, सवाद, धारवली, कालवली, आंग्रेकोंड, वावे, कुळेवाडी तसेच पोलादपूर तालुक्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच्या धामणदिवी गावांमध्ये गावभेटीचा दौरा आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांचा प्रचार दौरा तरुण, महिला तसेच जेष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वी पार पडला.

यावेळी शिवसेना उबाठा उपजिल्हाप्रमुख पद्माकर मोरे, तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, अजय सलागरे, चैतन्य म्हामुणकर, अकबरभाई वलीले, दिलीप भागवत, कृष्णा कदम, अनिल नलावडे, भरत चोरगे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कृष्णा करंजे, शेकाप विधानसभा चिटणीस एकनाथ गायकवाड, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती वैभव चांदे, विलास सकपाळ, सागर शिंदे, तैय्यबभाई, समीर चिपळूणकर, यासिन करबेलकर, नासिर माटवणकर, मुज्जमील तांबे यांच्यासह तरुण शेकाप कार्यकर्ते व शिवसैनिक तसेच महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाडमधील तरूणांचा ठाकरे गटात प्रवेश

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाड विधानसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे शिवसेनेला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. यातच आता असंख्य सुशिक्षित बेरोजगार तरूणांसह ज्येष्ठ नागरिकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे. या विधानसभा निवडणुकीत मतपरिवर्तन होणार असल्याचे व विकसित महाड विधानसभा होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, मविआच्या उमेदवार स्नेहल माणिक जगताप यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये स्थानिक तरुणांना नोकरीसाठी प्राधान्य देणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

आज अनेक तरुण तरुणी उच्च शिक्षण घेत आहेत. मात्र, स्थानिक तरुणांना औद्योगिक वसाहतीतमधील दादागिरी सहन करावी लागत असल्याने अनेक तरुण बाहेरील शहराची वाट धरत आहेत. यातच काही तरुण नोकरीच्या शोधात भटकत आहेत. त्यांना कायमचा रोजगार मिळावा यासाठी महाड मतदार संघातून सुशिक्षित व सर्व घटकांना सोबत घेत विकास साध्य करणारा लोकप्रतिनिधी म्हणून स्नेहल जगताप यांना वाढता पाठिंबा मिळत आहे. स्नेहल जगताप या रोजगारांसह शिक्षणाचा प्रश्न मार्गी लावू शकतात, असा विश्वास पक्षकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी तरुणांच्या हाताला रोजगार प्राप्त होईल असा विश्वास स्नेहल जगताप यांनी व्यक्त केला आहे.



# अतुल म्हात्रेंची प्रचारात आघाडी

## घरोघरी प्रचारफेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। कोलाड । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यातील पेण-रोहा आणि सुधागड विधानसभा मतदारसंघात आता ७ उमेदवार आमदारकीच्या रिंगणात असले तरी खरी लढत महायुती भाजपचे आमदार रविशेठ पाटील आणि महाविकास आघाडीचे अतुल म्हात्रे यांच्यात चुरशीची लढत होणार असल्याचे चित्र आहे.

येत्या २० नोव्हेंबर रोजी निवडणुक होणार असल्याने जेमतेम १३ ते १४ दिवस प्रचाराकरीता प्रत्येक पक्षाच्या व उमेदवार यांच्या हातात उरले आहेत. पेण- रोहा आणि सुधागड या विधानसभा मतदारसंघात सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. परंतु, असे असले तरी खरी लढत ही तिरंगी होणार असून यात महाविकास आघाडी शेकापचे उमेदवार अतुल म्हात्रे, महायुतीचे उमेदवार भाजपचे विद्यमान आमदार रविशेठ पाटील आणि शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार प्रसाद भोइर यांच्यात चुरशीची लढत होणार आहे. दरम्यान, शेकापचे अतुल म्हात्रे हे प्रचारात चांगलीच आघाडी घेताना दिसत आहेत. तसेच, ते ग्रामीण भागात बैठकांवरती व मतदारांच्या गाठीभेटींवर अधिक भर देत असल्याने प्रचारात मोठी आघाडी घेत असल्याचे दिसून येत आहे. अतुल म्हात्रेंची प्रचारात जोरदार आघाडी, घरोघरी प्रचारफेरीत उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता पाठिंबा मतदारांकडून मिळत असल्याने महाविकास आघाडी कार्यकर्त्यांचा उत्साह प्रचारात वाढताना दिसत आहे.

महाविकास आघाडीचे तसेच शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अतुल नंदकुमार म्हात्रे हे मतदारसंघात श्रमजीवी, कष्टकरी, शेतकरी जनतेच्या हितासाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. तसेच, अतुल म्हात्रे हे शेकापची भूमिका तसेच शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पोहोचवत आहेत. याआधी अतुल म्हात्रे यांनी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे केली आहेत. शिवाय पर्यटन, शैक्षणिक तसेच वैद्यकीय क्षेत्रात चांगली कामे करताना अनेक उपक्रम आणले आहेत. यामुळे गेली अनेक वर्षे या ठिकाणी शेकापचे उमेदवार येथील जनतेने निवडून दिले होते. यामुळे आता मतदारसंघावरही पक्षाचा प्रभाव आहे आणि तो आता मतांमधून दिसेल, असे मतदारसंघामध्ये बोलले जात आहे. दुसरीकडे २०१९ च्या निवडणुकीत भाजपने मोठी आश्वासे या मतदार संघात केली होती. परंतु, भाजपचे आमदार निवडून आले आणि दिलेल्या अनेक आश्वासनांचा त्यांना विसर पडला. यामुळे अनेक ठिकाणी मतदार संघात विकास कामांच्या नावाने नाराजीचे सूर उमटत आहेत. तर उबाठाकडून देखील शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार करत आहेत.

# खर्डी शाळेतर्फे गावामध्ये मतदार जनजागृती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील पळसगाव बुद्रूक केंद्रातील खर्डी खुर्द शाळेच्यावतीने शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा प्रकाश पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावामध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी विध्यार्थ्यांनी गावामध्ये प्रभातफेरी काढून जनजागृती केली. यावेळी विध्यार्थ्यांनी घोषवाक्य असलेले फलक हातात घेऊन जनजागृती केली. या शाळेतील विध्यार्थ्यांनी रांगोळी काढून यामध्ये प्रत्येक नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असा संदेश देऊन मतदानाची माहिती दिली.



# श्रीवर्धनमधील मुस्लिम मते निर्णायक

**। तळा । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पुढे जात असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांची धावपळ होताना पाहायला मिळाली. श्रीवर्धन मतदार संघात ज्ञानदेव पोवार यांनी उमेदवारी अर्ज मागे घेत शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल नवगणे यांना पाठिंबा दिला आहे. या मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अनिल नवगणे तर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार पक्षाकडून विद्यमान आमदार अदिती तटकरे यांच्यात मुख्य लढत होणार आहे.

रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन हा विधानसभा मतदार संघ एक महत्वाचा मतदार संघ मानला जातो. या मतदार संघात अजित पवार गटात असलेल्या अदिती तटकरे या विद्यमान आमदार आहेत. यामुळे ही जागा अदिती तटकरे यांनाच मिळणार असे बोलले जात होते. परंतु, श्रीवर्धन मतदार संघात तटकरे कुटुंबींयाबद्दल प्रचंड नाराजी असल्याचे चित्र आहे. यामुळे मतदारांना व कार्यकत्यांना खूश करण्यासाठी महायुतीच्या घटक पक्षांकडून प्रयत्न केले जात आहेत.

श्रीवर्धन या मतदार संघात शरद पवार यांना मानणारा मोठा कुणबी आणि मुस्लीम मतदार आहे. गेले कितेक वर्ष हा मतदार शरद पवार यांच्या सोबत आहे. यामुळे मुस्लीम आणि कुणबी मतदार येथील निवडणुकीच्या निकालाचे चित्र बदलवू शकतो. यामुळे त्यांची मते निर्णायक ठरु शकतात, अशी चर्चा श्रीवर्धन मतदार संघात रंगू लागल्या आहेत.

पोलीस निवडणूक निरीक्षक यांच्या सूचना

# कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करावी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

**विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी रायगड जिल्ह्यातील सातही मतदारसंघात कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच निर्भय व मुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी प्रभावी पोलिसिंग करावे, अशा सूचना पोलीस निवडणूक निरीक्षक स्वप्नील ममगाई यांनी दिल्या आहेत. रायगड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने निवडणूक तयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बुधवारी (दि. ६) संपन्न झाली.**

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, निवडणूक निरीक्षक संतोष कुमार राय, दुलीचंद राणा, सतीश कुमार एस, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, नवी मुंबई पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रविकिरण कोले यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीत आगामी निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात पुरेसे मनुष्यबळ तैनात ठेवावे. त्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करावा. मतदान केंद्रावर जाताना व येताना पोलिंग पार्टी रवाना होतील तेव्हा त्यांच्याबरोबर पोलीस कर्मचारीदेखील असावे. जिल्ह्यात निवडणूक आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सर्व अंमलबजावणी संस्थानी त्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य प्रामाणिकपणे बजावाव्या, असेही ममगाई यांनी यावेळी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रियेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून कार्य करावे, असे निर्देश या बैठकीत देण्यात आले.

बैठकीदरम्यान संवेदनशील मतदान केंद्राबाबत चर्चा करण्यात आली. निवडणुकीच्या पूर्वतयारीचे सर्व घटक तपासण्यात आले व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात पोलीस व्यवस्थेचा आढावा सादर केला.

# ढकलत नेलेली प्रजा

दहावीची परीक्षा उत्तीर्ण होणे अधिक सोपे करून टाकण्यात आले आहे. विज्ञान व गणितामध्ये ३५ नव्हे तर केवळ वीस गुण मिळाले तरी आता विद्यार्थी पास होणार आहेत. एकूणच अभ्यासक्रम आणि परीक्षांचा दर्जा तसेच काठिण्य पातळी खाली आणली जात आहे. त्याचा हा पुढचा टप्पा म्हणायला हवा. अशा वीस गुणांनी पास झालेल्यांना अकरावीसाठी शास्त्र शाखेत प्रवेश मिळणार नाही. किंवा त्यांना शास्त्र शाखेत प्रवेश हवाच असेल तर दहावीच्या विज्ञान व गणिताची पुन्हा परीक्षा देऊन अधिक गुण मिळवावे लागतील. दहावीला या दोन विषयांना धडकून शिक्षणाची गाडी बंद पडण्याचे प्रमाण आपल्याकडे मोठे आहे. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना आवडेल असा हा निर्णय आहे. मात्र तो एकूण समाजाच्या हिताचा नाही हे स्पष्टपणे नोंदवायला हवे. याच रीतीने अनेकांना इंग्रजी हा विषयदेखील कठीण जातो. काही दिवसांनी इंग्रजीतही वीस गुणांना पास अशी काही योजना येईल. या व्यवस्थेतून पुढे ढकलले जाणारे विद्यार्थ्यांचा दर्जा काय असेल आणि पुढे शिकून त्यांचे खरोखर काही भले होईल काय याचा विचार करायला हवा. मुळातच विज्ञान व गणितात पस्तीस टक्के गुण ही काही चांगली स्थिती नव्हती. तरीही अनेक वर्षांच्या चर्चेनंतर व शैक्षणिक संशोधनानंतर ३५ टक्के ही किमान अट ठरवण्यात आली होती. पूर्वीच्या काळी शिक्षणाच्या सोई व एकूण साक्षरता कमी होती. बहुसंख्य गरीब व खेडूत घरांमध्ये शिक्षणाचे वातावरण नसे. ते लक्षात घेऊनच पातळी ३५ टक्के इतकी ठेवली गेली असावी. मात्र आता काळ बराच पुढे आला. सध्या साक्षरतेचे प्रमाण सत्तर ते ऐंशी टक्के आहे. शिक्षणाचे महत्व सर्वदूर मान्य झाले आहे. या स्थितीत ही पातळी वाढवण्याच्या ऐवजी आणखी कमी केली जावी हे आपल्या समाजाच्या सार्वत्रिक अपयशाचे दारुण निदर्शक म्हणायला हवे.

### परीक्षा आणि दुष्टचक्र

याचा अर्थ आपण मुलांसाठी उत्तम शैक्षणिक व्यवस्था निर्माण करू शकलेलो नाही. मुलांमध्ये विविध विषयांची आवड व कुतूहल निर्माण करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट असते. सर्वच मुलांना विज्ञान, गणित किंवा भाषा इत्यादींमध्ये सारखीच गती असेल असे नाही. मात्र त्यांना या विषयांची किमान गोडी लागणे व त्यांचे महत्व समजणे हे त्यांच्या एकूण विकासासाठी आवश्यक असते. ही मुले समजा शेती किंवा गवंडी, सुतारकाम अशा कारागिरीच्या व्यवसायात गेल्यास तिथे तर विज्ञान व गणिताची अधिकच गरज असते. आपले दुर्दैव असे आहे की हे व्यवसाय आणि शाळेतले विज्ञान व गणिताचे शिक्षण यांची सांगड आपण घातलेली नाही. रोजच्या व्यवहारांमध्ये हे दोन विषय कसे सर्वत्र लागू पडतात व आवश्यक असतात हे सोप्या रीतीने आपण शिकवत नाही. बीजगणित, भूमिती ही तांत्रिक रीतीने शिकवली जाते. व्यवहारात त्यांचा उपयोग काय हे समजावले जात नाही. तीच गत भौतिक व रसायन शास्त्रातील नियमांची आहे. मुलांना समजा वाणिज्य, बँकिंग इत्यादी क्षेत्रात जायचे असेल तरीही त्यांना किमान गणिती कौशल्ये आवश्यक असतात. पण हे विषय इतक्या वाईट रीतीने शिकवले जातात की मुलांच्या सर्व काही डोक्यावरून जाते. अनेक शाळांमध्ये प्रयोगशाळा नसतात. त्यामुळे मुलांना प्रत्यक्ष प्रयोग करून दाखवणे वगैरे होत नाही. दुसरीकडे या व इतर कोणत्याही विषयांमध्ये पास होण्यासाठी ठराविक प्रश्न व उत्तरांचे साचे बनवले जातात. जी मुले पाठांतर करू शकतात ती यात बाजी मारतात. बाकीची मागे पडतात व त्यांना न्यूनगंड येतो. पाठांतरवाल्या तथाकथित हुशार मुलांना खरोखर हे विषय समजलेले असतात असे नव्हे. पण परिक्षेतले यश म्हणजेच सर्व काही असे मानले जाते. त्यातून एक दुष्टचक्र चालू होते. शिक्षकदेखील परिक्षेच्या दृष्टीने सर्व काही शिकवतात.

### आणखी किती खाली जाल?

अनेकदा प्रत्यक्ष शिकवण्यापेक्षा इतरच भानगडींमध्ये शिक्षकांचा बराच वेळ जातो. सध्या विविध उपक्रम घेणे याला फार महत्व दिलं जातं. त्यामुळे पर्यावरणविषयक जागृती किंवा अमुक-तमुक दिनाचे कार्यक्रम यांचे फार पेव फुटले आहे. ही जबाबदारी शिक्षकांवर टाकली जाते. दुसरीकडे खासगी शिकवणीवर्गांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे विद्यार्थीही शाळेत वा नंतर कॉलेजात शिकवण्याकडे फार लक्ष देत नाहीत. यामध्ये विषयांबद्दल गोडी लावणे वगैरे गोष्टी मागे पडतात. यामध्ये हुशार विद्यार्थी पुढे सरकतात. पण थोडे कमी हुशार वा ज्यांच्या घरी लिहिण्यावाचण्याचे वातावरण नाही असे विद्यार्थी मागे पडत जातात. अनेकदा त्यांना वेगळी शिकवणी लावणे शक्य नसते. तेच मग विज्ञान, गणित इत्यादींमध्ये नापास होतात. वीस टक्क्यांना पास करणे हा अशांच्या प्रश्नांवरचा इलाज नव्हे. एकूण शैक्षणिक व सामाजिक वातावरण बदलणे हे त्यासाठी आवश्यक आहे. आज सातवी-आठवीतील मुले धड वाचू शकत नाहीत किंवा साधी गणित करू शकत नाहीत. पदवीधर मुले कोणत्याही विषयावर चार वाक्ये धड बोलू शकत नाहीत किंवा नोकरीसाठीचे अर्ज किंवा पत्रे लिहू शकत नाहीत. काहीही न शिकता व शिकवता वर ढकलत नेलेली ही प्रजा आहे. मध्यंतरी तर नववीपर्यंत परिक्षाच घ्यायची नाही अशी पध्दत पाडण्यात आली होती. ही प्रजा नंतर कोणत्याही गेली तरी तेथील कामांचा दर्जा अत्यंत निकृष्ट राहतो. पासासाठीची मर्यादा वीस टक्क्यांवर आणणे म्हणजे या ढकलत नेलेल्या प्रजेमध्ये आणखी भर घालणे होय. शिक्षकांनाही गंभीरपणे शिकवण्याची गरजच राहू नये अशी ही तरतूद आहे. आजवर शिक्षणात मागे राहिलेल्या बहुजन, दलित, आदिवासी समाजाचे असल्या नियमांमुळे विशेष नुकसान होणार आहे. खऱ्या अर्थाने कस लागेल असे शिक्षणच त्यांना मिळणार नाही व वाईट म्हणजे त्याची गरजही कदाचित त्यांना भासणार नाही. समाजाला अधिकाधिक निर्बुध्द करीत नेणारा हा प्रकार आहे. त्याला सर्व स्तरांवरून जोरदार विरोध करायला हवा.

विचार

# काँग्रेस निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर का?

***उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेच्या नऊ जागांवर पोटनिवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या निकालाने ना सत्ताधारी पक्षाला फारसा फरक पडणार, ना विरोधक सत्तेच्या जवळ जाणार. मात्र विजयातून समाजवादी पक्ष आणि भाजपला नैतिक बळ मिळणार असल्याने त्याची विशेष चर्चा होत आहे. दरम्यान, आघाडी असतानाही येथे समाजवादी पक्षाने काँग्रेसला एकही जागा न दिल्याने काँग्रेस या निवडणुकीतून हद्दपार झाली आहे.***

**अजय तिवारी**

उत्तर प्रदेशमधील नऊ जागांसाठी १३ नोव्हेंबरला मतदान होणार असून निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. सामाजिक न्याय आणि समीकरणे लक्षात घेऊन भाजपने उमेदवारी देताना समाजवादी पक्षालाही चिमटे काढले. भाजपने अनुजेश यादव यांना करहालमधून उमेदवारी दिली आहे. ते धर्मेंद्र यादव यांचे मेहुणे आहेत. अर्थात ते अखिलेश यादव यांचेही मेहुणे आहेत. धर्मेंद्र यादव यांची बहीण संध्या यांचे अनुजेश हे पती असून त्या समाजवादी पक्षाच्या जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष आहेत. अनुजेश यांच्या आई समाजवादी पक्षाच्या आमदार होत्या. अनुजेश यांना भाजपचे तिकीट मिळताच धर्मेंद्र यादव यांनी त्यांचा आपल्याशी कोणताही संबंध नसल्याची घोषणा केली. मिल्कीपूरच्या जागेचा मुद्दा उच्च न्यायालयात असल्याने तेथे अद्याप निवडणूक जाहीर झालेली नाही. सांख्यिकीय दृष्टिकोनातून पाहता ही फार मोठी निवडणूक नाही. उत्तर प्रदेश विधानसभेच्या सव्वाचारशे जागांपैकी अवघ्या नऊ जागांवर निवडणूक होत आहे. या निवडणूक निकालाचा समाजवादी पक्ष आणि भाजप या दोघांनाही फारसा फरक पडणार नाही. ना भाजप सत्ता गमावणार आहे, ना समाजवादी पक्षाला ती मिळणार आहे. कारण भाजपकडे प्रचंड बहुमत आहे; मात्र २०२७ च्या निवडणुकीपूर्वीची ही उपांत्यफेरी मानली जाणार आहे. याशिवाय लोकसभा निवडणुकीच्या निकालावरही या निवडणुकीच्या निकालाने शिक्कामोर्तब होणार आहे. भाजप आणि समाजवादी पक्षामध्ये जनता सातत्याने कोणाच्या पाठीशी आहे, यावर या मतदानातून शिक्कामोर्तब केले जाणार आहे.



नऊ जागांसाठी निवडणूक होत असताना समाजवादी पक्षाने काही जागा काँग्रेसला सोडण्याची तयारी दाखवली होती; परंतु लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाजवादी पक्षाला 'वॉकओव्हर' दिला. 'इंडिया' आघाडीचा हा अतिशय महत्त्वाचा निर्णय आहे. पोटनिवडणुकीत काँग्रेस हे करू शकते तर विधानसभेत काय करू शकते, असे संकेत त्यामुळे दिले जात आहेत. काँग्रेसच्या या रणनीतीतून त्याग दिसतो. समाजवादी पक्ष आणि भाजप यांच्यात आता निवडणूक होत आहे. हे दोन पक्षच आता एकमेकांच्या विरोधात रिंगणात असतील; मात्र ही निवडणूक या दोन पक्षांभोवतीच केंद्रीत होऊ नये, यासाठी बहुजन समाज पक्ष रिंगणात उतरल्याने आता ही लढत तिरंगी झाली आहे. मायावती कधीही पोटनिवडणूक लढवत नसल्याचा इतिहास असला, तरी या वेळी त्यांनी आपली रणनीती बदलली असून सर्व नऊ जागांवर उमेदवार दिले आहेत. त्यामुळे निवडणूक अधिक रंजक बनली आहे. बहुरंगी लढत झाली, तर भाजपला फायदा होतो. भाजपला कोणत्याही परिस्थितीत पाच जागा वाचवायच्या आहेत. मध्यंतरी भाजपचा एक आमदार समाजवादी पक्षात दाखल झाला. त्यामुळे समाजवादी पक्षाला सहा जागा राखून आपली विश्वासार्हता वाचवावी लागेल. एकीकडे समाजवादी पक्षावर ही संख्या राखण्यासाठी दबाव आहे, तर भाजपवर चारच्या पुढे जाण्याचा दबाव आहे. करहाल या जागेची विशेष चर्चा होत आहे. त्याचे कारण येथून अनुजेश प्रताप सिंह यांच्या विरोधात अखिलेश यांनी तेजप्रताप यादव यांना उमेदवारी दिली आहे.

मुलायम सिंह हयात असतानाच समाजवादी पक्ष ताब्यात घेण्याची लढाई सुरू झाली होती. अखिलेश यांनी अत्यंत हुशारीने ती जिंकली. त्यात त्यांना राम गोपाल यादव यांची साथ लाभली असो वा काका शिवपालजींचा आशीर्वाद मिळाला असो. अनुजेश यांच्या पत्नी मैनपुरी नगरपालिकेच्या अध्यक्ष होत्या. या लोकसभा मतदारसंघातून मुलायमसिंह यांचे कुटुंब निवडून येत होते. अखिलेशही तिथूनच निवडून आले होते. अनुजेश आणि त्यांच्यात आधीच दुरावा तयार झाला होता. त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. आता अखिलेश यांच्या मेहुण्याच्या पराभवाची जबाबदारी तेजप्रताप यांच्यावर आहे. ती निश्चितच अवघड आहे. अनुजेश तिथे खूप सक्रिय आहेत. या निमित्ताने समाजवादी पक्षाला करहालमध्ये अडकवण्याचे काम भाजपने केले आहे. समाजवादी पक्षाने आतापर्यंत घोषित केलेल्या उमेदवारांवर नजर टाकली, तर त्यांच्या तिकिटाचे संयोजन खूपच मनोरंजक असल्याचे दिसते. फुलपूरमधून मुस्तफा सिद्दीकी, सिसामळमधून तुरुंगात असलेल्या इरफान सोलंकी यांच्या पत्नी नसीम सोलंकी, कुंदरकी येथील हाजी रिझवान आर्दीना उमदवारी देऊन समाजवादी पक्ष पुन्हा मुस्लिम ध्रुवीकरणाचे राजकारण पुढे नेण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मदतीने ही कामगिरी केली असून त्याचे चांगले परिणामही मिळाले आहेत. अशा स्थितीत बसपचा हत्ती किती धुमाकूळ घालतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. हत्तीच्या आगमनामुळे सायकलचा वेग वाढणार, की हत्तीवर चढून कमळ जिंकणार, ही सर्व समीकरणे खूपच रंजक ठरणार आहेत.

राज्यातील ज्या नऊ विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक होत आहे, त्यामध्ये अलीगढ जिल्ह्यातील खैर, आंबेडकर नगरमधील कटहारी, मुझफ्फरनगमधील मीरापूर, कानपूर शहरातील सिसामऊ, प्रयागराजमधील फुलपूर, गाझियाबाद, मिर्झापूरमधील माझवान, मुरादाबादमधील कुंदरकी आणि मैनपुरीच्या करहल विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. याशिवाय अयोध्या जिल्ह्यातील मिल्कीपूरची जागाही रिक्त आहे; मात्र तिथल्या निवडणुकीचे प्रकरण उच्च न्यायालयात असल्याने पोटनिवडणूक जाहीर झालेली नाही. राज्यातील नऊ जागांपैकी पोटनिवडणूक होत असलेल्या जागांपैकी २०२२ च्या विधानसभेत समाजवादी पक्षाने सर्वाधिक चार जागा जिंकल्या होत्या. भाजपने यापैकी तीन जागा जिंकल्या होत्या. राष्ट्रीय लोक दल आणि निषाद पक्षाचा प्रत्येकी एक उमेदवार विजयी झाला होता.

लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक आमदार खासदार म्हणून निवडून आले. यामध्ये अखिलेश यादव यांच्यासह अनेक आमदारांचा समावेश आहे. खासदार झाल्यानंतर त्यांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले. त्याच वेळी २०२२ मध्ये येथून विजयी झालेले समाजवादी पक्षाचे इरफान सोलंकी यांना अपात्र ठरवले गेल्यामुळे सिसामाऊ ही जागा रिक्त झाली आहे. भाजपने येथे 'आरएलडी'ला त्यांची जुनी मीरापूर ही जागा दिली आहे.

पोटनिवडणुकीमध्ये सर्व नऊ जागांवर 'इंडिया' आघाडीचे संयुक्त उमेदवार समाजवादी पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत. अखिलेश आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यात याबाबत फोनवर चर्चा झाली. यानंतर काँग्रेसच्या चिन्हावर उमेदवार न देण्याचा निर्णय घेण्यात आला. पोटनिवडणुकीमध्ये समाजवादी पक्षाने गाझियाबाद आणि खैर या जागा काँग्रेसला दिल्या होत्या; मात्र काँग्रेस पाच जागा घेण्यावर ठाम होती. नंतर समाजवादी पक्षाने फुलपूरची जागा सोडण्याचे संकेत दिले; मात्र समाजवादी पक्षाचे उमेदवार मुजतबा सिद्दीकी यांनी अर्ज दाखल केला. फुलपूरमध्ये उमेदवारी दाखल करून समाजवादी पक्षाने 'इंडिया' आघाडीचा मसुदा बिघडवला. काँग्रेसने ही जागा हट्टाने घेतल्यास अल्पसंख्याकांमध्ये राजकीयदृष्ट्या चुकीचा संदेश जाईल. साहजिकच काँग्रेस हा धोका पत्करणार नाही.

काँग्रेसने अन्य कोणत्याही जागेवर उमेदवार दिल्यास चुकीचा संदेश गेला असता. त्यामुळे काँग्रेसने पोटनिवडणुकीपासून दूर राहण्याचे ठरवले. मिळत असलेल्या जागांवर काँग्रेस कमकुवत झाली आहे. दुसरीकडे, हरियाणातील पराभवामुळे राहुल गांधींच्या नेतृत्वापुढे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसला यश मिळाले नसते, तर त्यांच्यासाठी आणखी एक समस्या निर्माण झाली असती. दुसरी गोष्ट म्हणजे काँग्रेस आपल्या मित्रपक्षांशी योग्य समन्वय ठेवत नाही, असा आक्षेप घेतला जातो. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष मजबूत आहे. याशिवाय अखिलेश यादव महाराष्ट्रात किमान बारा जागांची मागणी करत होते. काँग्रेस समाजवादी पक्षाला आपल्यात सामावून घेण्याचा प्रयत्न करत आहे; जेणेकरून या पक्षाला काही जागा दिल्या जातील.

अशा प्रकारे भाजपशी लढण्यासाठी राहुल गांधी काहीही करायला तयार आहेत आणि आपल्या जागा सोडत आहेत, असा संदेश देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्ष करत आहे. मात्र या निर्णयामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य खचणार आहे. काँग्रेसने दोन-तीन जागांवरही निवडणूक लढवली असती, तर लोकसभा निवडणुकीनंतर त्यांच्या कार्यकर्त्यांची जमवाजमव झाली असती. म्हणूनहा निर्णय काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्या प्रतिमेसाठी भलेही चांगला असेल; पण त्यामुळे कार्यकर्त्यांची नाराजी ओढवणार आहे.

आजकाल

# "शिक्षणाच्या जोडीने शहाणपणही यावं" डॉ. तारा भवाळकर

**जगदीश काबरे**

'लोकसत्ता दुर्गा जीवनगौरव पुरस्कार २०२४' च्या मानकरी डॉ. तारा भवाळकर यांनी हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर केलेल्या भाषणातील महत्त्वाचा संकलित अंश...

१) सांगलीमध्ये काही डॉक्टर, काही निरनिराळ्या क्षेत्रामधील मंडळी एकत्र येऊन आम्ही एक मासिक पत्रिका चालवतो. त्याच्यामध्ये जुन्या काळातलं चांगलं काय आणि ते 'सायंटिफिक' कसंय. आपल्याला वैज्ञानिक वगैरे असं म्हटलं की कळणं अवघड होतं. पण 'सायंटिफिक' म्हटलं की, अभिजात मराठीत पटकन कळतं. तर ते 'सायंटिफिक' कसंय हे सांगण्याचा प्रयत्न एक सद्गृहस्थ करत होते लेखनातून. आणि त्यामध्ये त्यांनी उदाहरण दिलं होतं की, कुंकू लावणं हे कसं 'सायंटिफिक' आहे. आपण सुज्ञ आहात. मला काय म्हणायचंय ते आपल्या लक्षात येईल. कुंकू लावलं की भ्रूमध्यामध्ये अमूक एक बिंदू कसा असतो आणि वैज्ञानिक दृष्टीने तो दाबबिंदू कसा असतो. त्यामुळे स्त्रियांचं मानसिक संतुलन वगैरे वगैरे कसं राहतं. माझं डोकं हे पहिल्यापासून तिरकं चालणारं आहे आणि त्यामुळे माझ्या मनामध्ये प्रश्न आला आणि मी त्या सद्गृहस्थांना त्या मासिकामध्ये लिहून विचारलं की, जर स्त्रियांचं मानसिक संतुलन नीट राहावं म्हणून कुंकवाची बिंदी वगैरे लावत असतील तिथे दाबबिंदूवर, तर सगळ्या पुरुषांचं मानसिक संतुलन बरोबर असतं का? आणि दुसरी गोष्ट जर स्त्रीचं मानसिक संतुलन नीट राहावं असं वाटत असेल तर मग विधवांचं काय? कारण त्यांना तर मानसिक संतुलनाची जास्त गरज आहे, सामाजिक आणि कौटुंबिकरित्या. तर अशा प्रकारचे जे काही युक्तिवाद केले जातात विज्ञानाच्या नावावर ते कसे असतात ते आपण समजू शकता. लोककलांनी बौद्धिक जागर करावा, ज्ञानाचा जागर करावा, अशी अपेक्षा असते. पण कधी कधी त्याच्यामध्ये अवैज्ञानिक गोष्टी वैज्ञानिक म्हणून घुसडल्या जातात. ज्याला 'स्यूडो सायन्स' असं म्हणतात. छद्म वा व्याज विज्ञान.

२) आमची बहिणाबाई चौधरी म्हणाली होती, तिला लिहिता-वाचता येत नव्हतं. आमच्याकडची सगळी मंडळी म्हणतात, बघा त्या बायका अडाणी असूनसुद्धा हे 'अडाणी असूनसुद्धा' म्हणणारे 'महाअडाणी' आहेत, असं माझं मत आहे. बहिणाबाई अनक्षर होत्या. अक्षर ओळख नव्हती. साहेब आमच्या देशात आल्यानंतर आमचा एक असा समज झालेला आहे की, लिहिता वाचता येणं म्हणजे शिक्षण. लिहिता-वाचता ज्या वेळेला माणसाला येत नव्हतं तेव्हा ती माणसं शेती करत नव्हती का? घरं बांधत नव्हती का? विहिरी खणत नव्हती का? घराचं वायुविजन राखत नव्हती का? वस्त्र विणत नव्हती का? स्वयंपाक करत नव्हती का? बाळंतपणं करत नव्हत्या का बाया? याला शिक्षण म्हणायचं की नाही? की फक्त लिहिता-वाचता येणं म्हणजे शिक्षण. मग माझी बहिणाबाई चौधरी म्हणते, "अरे, मानसा-परी मानूस राहतो रे येडाजाना आनि छापीसनी होतो कोरा कागज शहाना." छापल्यानंतर कोरा कागदसुद्धा शहाणा होतो, पण छापलेले अनेक कागद वाचल्यानंतर माणसासारखा माणूस येडा जाना राहातो. लिहिता वाचता आलं म्हणजे सर्व शिक्षण येतंच असं नाही, ते केव्हा येतं शहाणपण असलं त्याच्या जोडीला तर येतं. शिक्षणाने माणूस शहाणा व्हावा अशी अपेक्षा असते. होतोच असं नाही. असं ४५ वर्षं सर्व स्तरावर शिक्षण क्षेत्रात काम केल्यानंतर मी सांगते. म्हणजे अनुभवसंपन्न वगैरे काय म्हणतात ते सगळं. तर हे जे आपले अपसमज आहेत. त्या अपसमजातनं आपण नागर मंडळी जितक्या लवकर बाहेर येऊ तितकं बरं. आणि आम्हाला असं वाटत असतं आम्ही नगरी म्हणजे नागर, महानगरी मंडळी हे अतिजास्त सुबुद्ध आहोत, ते आहोत की नाही याचं जरा आत्मपरीक्षण करावं. एवढंच मी अत्यंत नम्रपणाने सांगू शकेन.

३) एकीकडे आम्ही आईला महन्मंगल, पवित्र वगैरे वगैरे वगैरे सगळं मानतो. आणि पहिली शिवी तोंडात येते ती आईवरून आणि बहिणीवरून. याच्यामधले जे विरोधाभास आहेत आमच्या जगण्यामधले. हे आमच्या कधी लक्षात येतात की नाही असा प्रश्न आहे. आई होणं हे जर महन्मंगल पवित्र असेल. तर मग आमचे बंधू, आमचे बाप असं कधी म्हणतात का? की, मला बाईच्या जन्माला घाल म्हणजे आई होता येईल चांगलं. मग माझी जात्यावर दळण दळणारी बाई जास्त शहाणी आहे हो. 'देवा नारायणा माझी विनंती फार फार, जन्म बायकांचा नको घालूस वारंवार.' जर बायकांचा जन्म एवढा पवित्र, उदात्त असता तर मला बायकांचा जन्म वारंवार घालू नको असं तिनं का म्हटलं असतं? आणि कुठल्याही पुरुषाने मग असे नवस का केले नसते मला बायकांचा जन्म घाल म्हणून. असले विरोधाभास आमच्या लक्षातच येत नाहीत पुष्कळदा की आमची कृती आणि उक्ती याच्यात फरक आहे. हे गौरवांकित करत असताना मोठी मोठी विशेषणं वापरायची आणि प्रत्यक्ष कृतीमध्ये तिसरंच काही तरी होत असतं.

४) शिकारी अवस्थेतून अजून आपण बाहेर आलेलो नाही. फक्त शिकारीच्या पद्धती बदलल्या. याच्याबद्दल जास्त सांगायची गरज नाही. हिंदीमध्ये हजारीप्रसाद द्विवेदी हे एक मोठे सामाजिक अभ्यासक आणि ललित लेखकही होते. त्यांचा एक सुंदर वैचारिक निबंध आहे. त्याचं उदाहरण मी मोनिकाला दिलं होतं. 'नाखून क्यू बढते है?'... 'माणसाची नखं का वाढतात?' हजारीप्रसादजींनी सांगितलं, "ये इस बात की निशानी है के आदमी में जानवर है। वो अब तक जिंदा है।" माणसामधला जनावर अजून जिवंत आहे, कारण जनावर अवस्थेमध्ये तो नखाने ओरबडून आणि दाताने ओरबडून शिकार खात असे. आता नखं वाढतायत आपली, तो शिल्लक राहिलेला शारीरिक अवशेष आहे, जैविक अवशेष. मानसिक अवशेषही वाढतोय की काय असा प्रश्न निर्माण होतो कधी कधी.

५) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ही चांगली गोष्ट आहे. समाधान आहे. कारण शासकीय पातळीवर कुठलं शिक्कामोर्तब होणं ही आनंदाची गोष्ट असते. तेवढा आनंद मलाही झाला. आपल्यालाही झाला. प्रश्न असा आहे ती मराठी भाषा टिकवण्यासाठी शिक्षण क्षेत्रात काम करत असलेली एक डोळस नागरिक म्हणून मी फक्त सांगते. मराठी भाषा शिक्षणामध्ये किती टिकते काय? मराठी शाळा किती बंद पडतायत? शिक्षकांना वेळेत अनुदान मिळतंय की नाही? पूर्ण वेळ शिक्षकांच्या नोकऱ्या मिळतायत की नाही? आपल्या मुलांना आपण मराठी माध्यमातून शिकवतो का? किती मंडळी पूर्णपणे घरामध्ये मराठी बोलतात? की पोरगं दुपट्यातनं बाहेर पडल्यापासनं तुला यलो कलर आवडतो का रेड कलर आवडतो? म्हणून विचारतात. लाल आणि पिवळा काही कळत नाही, तर अशा साध्या साध्या गोष्टी आहेत. मराठी टिकवायची असेल तर आपण मराठी किती वापरतो? कारण कुठलीही गोष्ट चलनात असते तोपर्यंत ती टिकत असते. चलनातनं गेलं की नाणं बाद होतं. 'भाषा' ही एक सजीव संस्था आहे. आणि ती सजीव संस्था जर सजीव राहायची असेल तर सजीवांनी तिचा जागरूकपणे वापर केला पाहिजे. **(साभार)**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**७ नोव्हेंबर**

**१८६८ :-** व्याकरणकार आणि व्याकरणावरील विवाद्य प्रश्नाचे चर्चक मोरो केशव दामले यांचा जन्म. केशवसुत हे त्यांचे वडीलबंधू. एडमंड बर्कच्या व्याख्यानांच्या भाषांतराने लेखनाला सुरुवात करणाऱ्या मोरोपंतानी 'न्यायशास्त्र- निर्गमन' व 'न्यायशास्त्र - विर्गमन' हे दोन ग्रंथ लिहिले. तथापि, मराठी साहित्यात त्यांचा नावलौकिक झाला तो त्यांनी लिहिलेल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरण' ह्या ग्रंथामुळे. वयाच्या अवघ्या ४५ व्या वर्षी रेल्वे अपघातात निधन. **१९०३ :-** शिक्षण व बाल मानसशास्त्र या विषयांवर मराठीत लिहिणारे भास्कर धोंडो कर्वे यांचा जन्म. 'बालपणचे रहस्य', 'बाल अवलोक', 'भाषा व्यवसाय', 'अध्यापन व मानसशास्त्र', शिक्षण विषयक नवे विचार' ही त्यांची पुस्तके होत. महर्षी अण्णासाहेब कर्व्यांचे ते द्वितीय पुत्र. **१९०५ : -** मराठी कवितेला आधुनिक रुप देणारे कवी केशवसुत तथा कृष्णाजी केशव दामले यांचे वयाच्या अवघ्या ३९व्या वर्षी निधन इंग्रजी रोमँटिक (अद्भुतवादी) काव्य आणि पंतकाव्य यांच्या पुढे जाणारी, देशप्रेम आणि व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये मानणारी कविता त्यांनी लिहिली. 'तुतारी', 'नवा शिपाई', 'हरपले श्रेय', 'सतारीचे बोल' या त्यांच्या महत्त्वपूर्ण कविता आहेत. **१९१४ :-** लेखक, संपादक ना. रा. शेंडे यांचा जन्म. 'पुजा' मासिकाचे संपादक दै. भारतचे सहसंपादक असणाऱ्या शेंडे यांची दलितांना उद्देशून 'आंतिद्रिय विश्वातील मं.च्छाया' ह्या वैचारिक पुस्तकांसह 'सावली' हा लघुकथा संग्रह, 'लोकसाहित्यसंपदा' हे लोकसाहित्य तसेच चार कादंबऱ्या, तीन चरित्रे मिळून १५ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९१५ : -** कृष्णाजी नारायण कांबळे यांचा जन्म. त्यांचे 'कृष्णा' हे आत्मवृत्त निधनानंतर प्रकाशित वाले १२ जुलै १९९३ गेली त्यांचे निधन झाले. **१९२४ :-** लेखक आणि कुलकर्णी ग्रंथागार या प्रकाशन संस्थेचे संस्थापक पंडित अनंत कुलकर्णी यांचा जन्म. ह्यांची 'अभिसार', 'माझी न मी राहिले' ह्या कादंबऱ्या 'किशोरकुंज भाग १,२', 'माझं बालपण' या पुस्तकातून नामवंत आत्मकथाचे संकलन, 'मातीतले मोती' हा ग्रामीण कथासंग्रह 'लाडक्या लेकी' अशी ग्रंथ संपदा. **१९२५ : -** 'सर्कस' या विषयावर लेखन करणारे अँड सर्कसचे मालक शिवानी शंकर कर्लेकर यांचा जन्म. ह्यांनी 'अशी सर्कस असे खेळाडू', 'अँड सर्कस', 'सर्कशीच्या जगात', 'सर्कशीच्या रिंगणात' अशी सर्कशी जगताशी संबंधीत पुस्तके लिहिलीत. याशिवाय 'जादूचे अद्भुत प्रयोग' हे पुस्तकही त्यांच्या नावावर आहे. **१९२९ : -** कवी अनंत लक्ष्मण पाठक यांचा जन्म. 'अनंताची फुले' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९३३ :-** कथा - कांदबरी लेखिका कुमुद अनंत मंडलेकर यांचा जन्म. 'सांजवला किनारा', 'जाग प्रत्यय', 'पडसाद', 'देहकिनारा', 'माळरान' ह्या कथासंग्रहासह 'डोंगरकडा', 'बाभूळफूल' ह्या कादंबऱ्या अशी साहित्य संपदा. **१९३३ : -** लेखक संभाजी सदाशिव होकम यांचा जन्म. 'उत्कंठा', 'भरारी', 'राष्ट्रवंदना' मिळून सहा काव्यसंग्रह 'महामृत्युंजय मार्कंडेय' हे प्रदीर्घ काव्य याशिवाय १५० हून अधिक काव्य, ५० हून अधिक लेख मासिके, दिवाळी अंक यातून प्रसिध्द. याखेरीज १० काव्यसंग्रहांना प्रस्तावना, ७ नाटके, १२ काव्यसंग्रहाचे समीक्षक त्यांनी केले आहे. **१९३४ : -** कादंबरी, लघुकथा लेखक, निवेदिका आणि बालसाहित्यिक निर्मला प्रभाकर कुलकर्णी यांचा जन्म. यांची 'आयेषा' ही कादंबरी रायडर हँगार्डच्या कादंबरीचा अनुवाद असून 'इमान', 'सावली' या कादंबऱ्यांसह 'सेतू' ही कथा आणि 'जॉन केनडी', 'महात्मा' हे मुलांसाठी लिहिलेली चरित्र अशी साहित्य संपदा. **१९३८ : -** साहित्यिक कृष्णाजी बल्लाळ गोडबोले यांचे निधन. 'रॉबीनहूड', 'एल्फिन्स्टन', 'ड्युप्ले' आदींची चरित्र त्यांनी लिहिली. ज्यांची 'अनाथ पांडुरंग' ही दुसऱ्या बाजीरावाच्या अनागोंदीच्या कारभारावर बेतलेली आहे. याशिवाय 'हिंदुस्थानातील एतद्देशीय विद्यमान राज्ये', 'संस्थाने व जहागिरी यांचा इतिहास' ग्रंथाचा अनुवाद आहे. **१९४७ :** आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून लेखन व्यवसाय लेखन करणाऱ्या लेखिका डॉ. रत्नावली दातार यांचा जन्म. साप्ताहिके आणि मासिकातून त्यांच्या अनेक कथा प्रसिध्द.

- **संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

७ नोव्हेंबर

१) श्री. वसंत अनंत साळवी
अलिबाग, ७-११-१९४५

२) श्री. जयप्रकाश शांताराम वेदक
अलिबाग, ७-११-१९४१

३) श्रीम. मनोरमा रमाकांत शिंदे
अलिबाग, ७-११-१९४५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते

**१. कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**२. स्व. परेश नवीनचंद्र गाला स्मरणार्थ सांताक्रूझ मुंबई**

# विद्यार्थी सुरक्षा उपाययोजना कागदावर

- **अंमलबजावणी होत नसल्याच्या तक्रारी**
- **वस्तुस्थितीदर्शक अहवालासाठी ७ नोव्हेंबरची डेडलाईन**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे निर्देश शाळांना शिक्षण विभागाकडून देण्यात आलेले आहेत. मात्र, या उपाययोजनांची अंमलबजावणी होत नसल्याचे समोर आले असून या संदर्भातील वस्तुस्थितीदर्शक अहवाल ७ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालकांना शिक्षण आयुक्त कार्यालयाचे शिक्षण सहसंचालक दिलीप जगदाळे यांनी दिले आहेत.**



बदलापूर येथे घडलेल्या घटनेनंतर शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबतच्या विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. त्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने काळजी घेणे, विद्यार्थी सुरक्षिततेसाठी शाळेमध्ये तक्रार पेटी बसवणे, सखीसावित्री समितीच्या तरतुदींचे पालन करणे, विद्यार्थी सुरक्षा समिती स्थानिक पातळीवर नियुक्त करणे अशा उपाययोजनांच्या अंमलबजावणीचे निर्देश शिक्षण विभागाने दिले होते. मात्र, उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत विविध माध्यमांमधून काही तक्रारी आक्षेप नोंदवण्यात येत असल्याचे जगदाळे यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.

शालेय विद्यार्थी सुरक्षेसंबंधी त्रुटी राहिल्याबद्दल शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळांना नोटिसा दिल्यानंतर पुढे कोणतीही कारवाई केलेली नाही, अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही बंद आहेत, बऱ्याच शाळांमध्ये सीसीटीव्ही फुटेज तपासले जात नाही, सीसीटीव्हीचे बॅकअप ठेवण्यात येत नाही, विविध समित्या केवळ कागदावर स्थापन केलेल्या आहेत, त्यांचे अहवाल निरीक्षणासाठी उपलब्ध नाहीत, स्कूल वाहन सुरक्षेसंबंधी उपाययोजना केलेल्या नाहीत. स्कूलवाहन चालकांचे मोबाइल क्रमांक उपलब्ध नाहीत, कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी केलेली नाही, अशा स्वरुपाच्या तक्रारींचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर शाळा सुरक्षेसंबंधी सद्यस्थितीतील प्रगतीच्या तपशीलासह उपाययोजनांचा वस्तुस्थितीदर्शक तपशीलवार अहवाल सादर करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी कारवाई प्रलंबित ठेवली असल्यास किंवा कारवाई केलीच नसल्यास त्याबद्दल खुलासा घेऊन तसा अहवाल सादर करावा, तसेच कारवाई पूर्ण होण्यासाठीचे पर्यवेक्षण करावे, संबंधित कार्यवाहीचा अहवाल ७ नोव्हेंबरपर्यंत सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# सावंतवाडीत राजकीय ‘‘संशयकल्लोळ’’

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**

महाविकास आघाडी व महायुतीमध्ये झालेल्या बंडखोरीमुळे कोणाची मते कोण पळवणार, याची चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. काही पदाधिकारी अंतर्गत बंडखोरांचे काम करत असल्याच्या छुप्या चर्चांमुळे अंतर्गत संशयकल्लोळ सुरू आहे.

सावंतवाडी विधानसभा मतदारसंघामध्ये मागच्या तीन टर्मचा विचार करता दीपक केसरकर व राजन तेली या दोन चेहऱ्यांव्यतिरिक्त यावेळी विशाल परब आणि अर्चना घारे हे दोन नवीन चेहरे घराघरांत पोहोचले आहेत. अर्चना घारे यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून, तर विशाल परब यांनी भाजपचे काम या मतदारसंघात केले आहे.

याच्याच जोरावरच विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, महाविकास आघाडी आणि महायुतीच्या जागा वाटपामध्ये दोघांचीही पक्षाकडून निराशा झाली. पक्षाने निराश केले तरी स्वतः केलेल्या कामाच्या जोरावर या दोघांनी निवडणुकीच्या रिंगणात उमेदवारी अर्ज भरून केसरकर आणि तेली यांच्यासमोर काहीसे आव्हान निर्माण केले आहे. परब व घारे या निवडणूक लढवण्यावर ठाम राहिले आहेत. आता दोघांकडून प्रचाराची रणनीतीही आखली जात आहे.

मतदारसंघाची सद्य:स्थिती पाहता चारही उमेदवारांमध्ये मत विभागणी होणार आहे. महायुतीमध्ये भाजपची मते छुप्या पद्धतीने विशाल परब यांच्याकडे वळण्याच्या शक्यतेची चर्चा सुरू आहे. काही भाजपमधल्या पदाधिकाऱ्यांनी परब यांचे काम सुरू केले आहे. त्यामुळे जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी परब यांच्या निलंबनाबरोबरच संबंधित पदाधिकाऱ्यांना अल्टिमेटम दिला आहे. केसरकर यांच्यावर असलेली भाजपमधील लोकांची नाराजी यामागचे मूळ कारण आहे. ही नाराजी दूर करणे भाजपमधील नेत्यांसमोर आव्हान आहे.

केसरकर यांनीही आपल्या आजपर्यंतच्या राजकीय अनुभवाचा वापर करून ही मते आपल्याकडे वळवल्यास त्यांना याचा निश्चितच फायदा होईल. दुसरीकडे तेली हे गेले कित्येक वर्षे भाजपमध्ये कार्यरत असल्याने भाजपमधील काही लोकांमध्ये त्यांचा असलेला थेट संपर्क तेलींच्या पथ्यावर पडणार आहे. भाजपची ही मते तेलींकडे वळण्याची शक्यता आहे. अर्थात ही मते वळवण्यासाठी स्थानिक पातळीवरील पदाधिकाऱ्यांची गरजही या दोघांना लागणार आहे. त्यामुळे काही नेते छुप्या पद्धतीने अपक्षांचे काम करत असल्याची चर्चा सुरू आहे. महाविकास आघाडीतही वेगळी परिस्थिती नाही. अर्चना घारे यांनी राष्ट्रवादीच्या उभारणीबरोबरच गावागावात महिलावर्ग तसेच थेट ग्रामस्थांच्या घराघरांत जाऊन संपर्क, आपुलकी निर्माण केली आहे.

मात्र, त्यांना पडणारी मते राष्ट्रवादी म्हणून तयार केलेली असण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास महाविकास आघाडीचा तोटा होणार आहे. एकूणच दोन्हीकडे या सगळ्यातून राजकीय संशयकल्लोळ निर्माण झाला आहे. बंडखोरी थोपवण्याचे प्रयत्न दोन्ही गटांकडून सुरू आहेत.

# संगमेश्वरमध्ये वायंगणी शेतीची तयारी

**। संगमेश्वर । वृत्तसंस्था ।**

भात कापणीनंतर सध्या कोकणातील शेतकरी वायंगणी शेतीत गुंतला असल्याचे चित्र ठिकठिकाणी दिसत आहे. यामध्ये पावटा, हरभरा, मूग पिकांची लागवड अधिक प्रमाणात करण्यात येत आहे.भात कापणीनंतर काही भागात वायंगणी शेती केली जात असल्याचे चित्र संगमेश्वर खाडीभाग व परचुरी परिसरात दिसत आहे.

भात कापणीची कामे ५० टक्के पूर्ण झाली असून दुसऱ्या टप्प्यात शेतकरी वायंगणी शेतीकडे वळला आहे. शास्त्री, सोनवी, बावनदी, असावी नदीच्या किनाऱ्यावर ही शेती केली जाते. ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात वायंगणी शेतीला प्रारंभ होतो. यावर्षी मुसळधार पावसाने भातशेती कापणीची कामे लांबणीवर पडली आहेत; मात्र सकाळच्या दरम्याने भातकापणी आणि लगेचच झोडणीचे काम केले जात आहे. भात कापणीबरोबर शेतात जाऊन शेतकरी वायंगणी शेतीचे काम करत आहे. ओझरखोल, परचुरी आदी भागात ही शेती सुरू झाली आहे. याबरोबरच मुळा, पाभाजी, मिरची, वांगी आदीची लागवड करण्यात येत आहे.ग्रामीण भागात होणाऱ्या वायंगणी शेतीमधील भाजी व पिके जवळच्या बाजारपेठेत विक्रीसाठी आणली जातात. त्यातून शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

# दोन युवकांचा बुडून मृत्यू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील सडवे येथील नदीवर सोमवारी (दि.४) सायंकाळच्या सुमारास दोन युवक मासे पकडण्यासाठी गेले असता पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुजीत सुभाष घाणेकर (२५) आणि आयुष अनिल चिनकटे (२१) असे या मृतांचे नाव आहे. हे दोघे सायंकाळी साडेचारच्या सुमारास गंभीर डोह येथे मासे पकडण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांचा पाय घसरून ते पाण्यात पडले. पाणी खोल असल्याने ते दोघे बुडाल्याची माहिती मिळत आहे. यावेळी ग्रामस्थांनी या दोघांचा शोध घेतल्यानंतर त्यांचे मृतदेह सापडले. अधिक तपास दापोली पोलीस करित आहेत. या घटनेमुळे सडवे गावावर शोककळा पसरली आहे.

# वादळाचा महावितरणला बसला तडाखा

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

वेगवान वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळे विजेचे खांब, वीजवाहिन्या पडून गणपतीपुळे, जाकादेवी, मालगुंड, खंडाळा, जयगड व आजुबाजूच्या गावांतील सुमारे १८ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. येथील वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या ४० कामगारांना चार दिवस अथक परिश्रम करावे लागले. ऐन पर्यटन हंगामात वीज खंडित राहिल्यामुळे गणपतीपुळे, मालगुंड येथील व्यावसायिकांनाही तोटा सहन करावा लागला.

३१ ऑक्टोबरला २२० केव्ही वाहिनीसह निवळी उपकेंद्र येथून जाणारी ३३/११ केव्ही चाफे व खंडाळा उपकेंद्र यांना जोडणाऱ्या वाहिनीचे दहा खांब पडले होते. त्यामुळे गणपतीपुळे, जाकादेवी, मालगुंड, खंडाळा, जयगड व आजुबाजूच्या गावांतील सुमारे १८ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. १ नोव्हेंबरला सायंकाळी वादळ आणि पाऊस थांबल्यानंतर महावितरणकडून दुरुस्तीला सुरवात झाली. सायंकाळपर्यंत दोन खांब उभे करून वाहकताराही जोडण्यात आल्या. सायंकाळी विजांसह झालेल्या जोरदार पावसामुळे आणि अंधारामुळे नाइलाजाने हे काम थांबवावे लागले. उर्वरित आठ खांबांच्या वाहकतारा दरीच्या बाजूला झाडांमध्ये अडकल्या असल्यामुळे महावितरणच्या पथकांकडून काम थांबवण्यात आले. काळोखामुळे कार्यवाही करणे शक्य नव्हते. २ नोव्हेंबरला उर्वरित काम पूर्ण करण्यात आले आणि वाहिनी भारित करण्यात आली; मात्र हे काम करताना कोतवडे शाखा कार्यालय परिसरातही २ उच्चदाब विजेचे खांब आणि ३ लघुदाब विजेचे खांब, मालगुंड शाखा कार्यालय परिसरातील ७ लघुदाबाचे, जाकादेवी शाखा कार्यालय परिसरातील २ लघुदाबाचे खांब पडले होते. हे काम करण्यासाठी ४ नोव्हेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागली.

दरम्यान, या कामासाठी खंडाळा उपकेंद्रातील ३ सेक्शनचे २० कर्मचारी, रत्नागिरीतील दोन ठेकेदारांची पथकं आणि लांजा येथील एक पथक असे मिळून ४० कामगार चार दिवस अथक परिश्रम करित होते. दिवाळीची सुटी असल्यामुळे कामगारांची कमतरता होती. तरीही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी या परिस्थितीवर मात करत वीजपुरवठा सुरळीत केला; मात्र याचा फटका ऐन दिवाळीत फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांसह व्यावसायिकांना बसला.

> तरवळ, जाकादेवी परिसरात वादळामध्ये विजेचे खांब पडून पुरवठा खंडित झाला होता. त्याचा फटका व्यावसायिकांना बसला. तरीही जनरेटद्वारे वीज सुरळीत ठेवण्याचा खटाटोप काहींनी केला; परंतु वीजपुरवठा कमी दाबाने सुरू राहिल्यामुळे अडचण झाली होती.
>
> - कल्पेश सुर्वे, गणपतीपुळे.

## उमेदवारांच्या समाजमाध्यमांवर लक्ष

**रत्नागिरी :** विधानसभा निवडणूक कालावधीत प्रिंट, इलेक्ट्रॉनिक विशेषतः उमेदवारांच्या समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या आक्षेपार्ह बातम्या, मजकुरांवर आणि पेड न्यूजवर लक्ष ठेवा, अशी सूचना सर्वसामान्य निवडणूक निरीक्षक जनक प्रसाद पाठक यांनी दिली. माध्यम कक्षाला सर्वसामान्य निवडणूक निरीक्षक पाठक, खर्च निरीक्षक पुरुषोत्तम कुमार आणि निवडणूक निरीक्षक राजेंद्र प्रसाद मीना यांनी भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एम. देवेंदर सिंह, पोलिस अधीक्षक धनंजय कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार उपस्थित होते.

# गांजा सेवन करणाऱ्या तीन जणांवर गुन्हे

**। कल्याण । वृत्तसंस्था ।**



गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करण्यास प्रतिबंध आहे. अशाही परिस्थितीत येथील महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या गस्तीवरील पोलिसांनी तीन वेगळ्या ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करणाऱ्या व्यक्तिंना पकडून त्या तीन जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.

शहाड जवळील म्हारळ रस्त्यावरील सेंच्युरी रेयॉनच्या प्रवेशद्वाराच्या बाहेरील भागात सार्वजनिक रस्त्यावर एका टँकरच्या आडोशाला बसून नेमसिंग राठोड हे गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करताना गस्तीवरील पोलिसांना आढळून आले. ते म्हारळ गाव भागात राहतात. दुसऱ्या एका प्रकरणात कल्याण पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील नीलम गेस्ट हाऊस मागील गल्लीत ताहीर सय्यद यांना गांजाचे सेवन करताना पोलिसांनी पकडले आहे. ते रिक्षा चालक आहेत. ते नेवाळी नाका भागात राहतात.

कल्याण रेल्वे स्थानकाजवळ बैजनाथ सिंग हे गांजाचे सेवन करत होते. ते चिंचपाडा भागात राहतात. ते मजूर आहेत. गस्तीवर असताना पोलिसांना ते आढळून आले. महात्मा फुले पोलीस ठाण्यातील हवालदार महेंद्र मंझा, श्रीधर वडगावे यांच्या तक्रारीवरून महात्मा फुले पोलीस ठाण्यात या तिन्ही व्यक्तींविरुध्द अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# उत्खननामुळे सातार्डा पुलाला धोका

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र व गोव्याला जोडणाऱ्या तेरेखोल नदीवरील सातार्डा पुलाखाली अनधिकृत वाळू उपसा केल्यामुळे पुलाला धोका निर्माण झाला आहे. या पुलांवरून रोज विद्यार्थी, शासकीय कर्मचारी, गोवा येथे कामानिमित्त जाणारे युवक ये-जा करीत असतात. येत्या पंधरा दिवसांत बेकायदेशीर वाळू उत्खननावर कारवाई करून संबंधितांवर गुन्हे दाखल करून पुलाची पाहणी करावी. याबाबत संरक्षणात्मक उपायोजना न केल्यास सातार्डा पुलावर रास्ता रोको आंदोलन करून बेमुदत उपोषण करू, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते नितीन कळंगुटकर यांनी प्रशासनाला दिला आहे.

याबाबत त्यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, पुलावरून रोज शाळेत जाणारी मुले, शासकीय कर्मचारी, वकील, गोवा येथे नोकरीस जाणारे कर्मचारी, मोलमजुरी करणारे मजूर वाहनाने तसेच पायी ये-जा करत असतात. या पुलावरून सिंधुदुर्गसह गोव्यातील विविध वाहने लाखोंच्या संख्येने दररोज प्रवासी वाहतूक करतात. पुलाच्या पायास धोका असून, खांबांना तडे गेले आहेत. पुलही खचत आहे. या पुलांवरून वाहने जात असताता पूल हालत असतो. त्यामुळे तो कोणत्याही क्षणी कोसळण्याची दाट शक्यता आहे. यामुळे त्यावरून वाहतूक करणाऱ्या वाहनांना तसेच प्रवाशांना, शाळकरी मुलांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

## तक्रार निवारण कक्षाची पाहणी

**रत्नागिरी :** आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सी-व्हिजील ॲपवर दाखल झाल्यास त्यावर तत्काळ कार्यवाही करा तसेच तक्रार दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या शंकेचे निरसन झाल्याची खात्री करा, असे सांगून निवडणुकीशी संबंधित तक्रार व मदत मागितलेल्या व्यक्तींचीही तक्रार निरसन झाल्याची शहानिशा करा, अशी सूचना सर्व सामान्य निवडणूक निरीक्षक जनक प्रसाद पाठक यांनी दिली. केले.

# उच्च शिक्षणाचा २६ विद्यार्थ्यांचा मार्ग सुकर

- **पुण्यातील दिशा परिवाराचा उपक्रम**
- **शिष्यवृत्तीतून ७ लाखांची मदत**

**। राजापूर । वृत्तसंस्था ।**

तालुक्यातील नर्सिंग, फार्मसी, वैद्यकीय, इंजिनिअरिंगसह अन्य विविध शाखांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या २६ विद्यार्थ्यांना पुणे येथील दिशा परिवाराच्या राजापूर शाखेतर्फे शिष्यवृत्तीपोटी ७ लाख ३३ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे.

त्यामुळे गुणवान विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षण घेण्याचा मार्ग सुकर झाला आहे.आर्थिक पाठबळाअभावी बारावीनंतरचे शिक्षण घेऊ न शकणाऱ्या गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना पुणे येथील दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पुढील शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ दिले जात आहे.

यंदा २६ विद्यार्थ्यांना लाभ दिला गेला आहे. त्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा पुणे येथील दिशा परिवार राजापूर शाखेतर्फे राजापूर हायस्कूलच्या कलामंदिर सभागृहात दीपावली स्नेहमेळावा नुकताच झाला.

या प्रसंगी बी. के. गोंडाळ यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत नवनिर्वाचित पोलीस उपनिरीक्षक प्रतीक राणे यांनी विद्यार्थ्यांना मौलिक सल्ला दिला तसेच स्वप्नातील ध्येयाला सत्यात आणण्यासाठी प्रथम आपल्यातील क्षमता तपासून पाहाव्यात त्यानंतर वेळेचे आणि अभ्यासाचे नियोजन करावे.

यासाठी आपली दैनंदिनी महत्वाची असते, असे राणे यांनी सांगितले.या वेळी राणे यांनी पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंतचा खडतर प्रवास साऱ्यांसमोर उलगडला. सर्व विद्यार्थ्यांना दिशा परिवारातर्फे दिवाळी भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुशीला गोरे आणि सुत्रसंचालन सानिका चव्हाण हिने केले.

# कवठणी-जाधववाडी ग्रामस्थांचा निवडणुकीवर बहिष्काराचा इशारा

**। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।**

कवठणी जाधववाडी येथील दलितवस्तीला जाणाऱ्या रस्त्याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करून सुद्धा वंचित ठेवल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर आणि यापुढील सर्व सार्वत्रिक व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर सामूहिकरित्या बहिष्कार घालण्याचा इशारा ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

दलितवस्तीपासून कवठणी गावात जाण्यासाठीचा मुख्य रस्ता, ग्रामपंचायत दप्तरी नोंद असलेली पायवाट, स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग यापासून वस्तीला वर्षानुवर्षे वंचित ठेवण्यात आलेले आहे. या मूलभूत गरज असलेल्या या तिन्ही रस्त्यांसाठी मागील कित्येक वर्षांपासून आमची मागणी आहे. याप्रश्नी २००७ पासून लेखी पत्रव्यवहार व पाठपुरावा सातत्याने करीत आलेलो आहोत; परंतु आमच्या मागणीकडे पूर्णतः दुर्लक्ष होऊन गरजेच्या अशा प्राथमिक सुविधेपासून आमच्या वाडीला वंचित ठेवण्यात आले. ग्रामस्थांना रस्ता नसल्याने बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. लहान शाळकरी मुले, वयोवृध्द, अपंग व्यक्ती, गरोदर स्त्रियांना या त्रासाला सामोरे जावे लागते. एखाद्या प्रसंगी कुणी आजारी पडल्यास रस्त्याअभावी वाहन येऊ शकत नसल्याने रुग्णाला दवाखान्यात दाखल करताना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. रात्रीच्या वेळी ही समस्या प्रकर्षाने भेडसावते. आमच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय द्यावा; अन्यथा आमच्या मताला कोणतेच महत्त्व नाही, असे समजून येणाऱ्या सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकावा लागणार आहे. तसा निर्णय सर्व ग्रामस्थांनी मिळून घेतलेला आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या सामाजिक-भावनिक शिक्षणावर भर

# कलेच्या माध्यमातून गिरवणार धडे

**। रायगड । सुयोग आंग्रे ।**

**आदिवासी विकास विभागाकडून स्लॅम आऊट लाऊड आणि गर्ल रायझिंग या संस्थांच्या सहकार्याने आश्रमशाळांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांमधील सामाजिक-भावनिक शिक्षणाचा स्तर वाढवण्यासाठी अभिव्यक्ती हा नावीन्यपूर्ण प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना कथा-कथन, नाट्य, कविता आणि दृश्य कला या माध्यमांतून शैक्षणिक धडे दिले जाणार आहेत.**



राज्यात आदिवासी विकास विभागाच्या ४९७ शासकीय आश्रम शाळा असून, त्यामध्ये सुमारे दोन लाख विद्यार्थी प्रवेशित आहेत. या विद्यार्थ्यांच्या सामाजिक-भावनिक शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे व आयुक्त नयना गुंडे यांच्या पुढाकाराने अभिव्यक्ती प्रकल्प सुरू झाला आहे. त्यासाठी कलेवर आधारित अभ्यासक्रम बनविला आहे.

या प्रकल्पात पहिल्या वर्षी १० हजार विद्यार्थी, २०० शिक्षक आणि ४० एसईएल चॅम्पियन्सपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे. दरम्यान, अभिव्यक्तीद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना सामाजिक-भावनिक शिक्षणाच्या तत्त्वांसोबतच हवामान बदल, तसेच किशोरवयीन मुलांमधील भावनिक जागरूकता आणि विश्लेषणात्मक विचार यासारख्या महत्वपूर्ण कौशल्यांसह सक्षम बनविले जाणार आहे. लैंगिक समानतेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.

### शिक्षकांना दोन दिवसीय प्रशिक्षण

**नाशिक अपर आयुक्तालयातील शिक्षकांना अभिव्यक्ती प्रकल्पाअंतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण दिले. नागपूर, ठाणे आणि अमरावती विभागांमध्येही प्रशिक्षण दिले जाणार आहे. दरम्यान, अभिव्यक्तीमध्ये शिक्षकांना सामावून घेतले असून, त्यांना प्रशिक्षित केले जात असल्याचे स्लॅम आऊट लाऊडच्या नेहा राठी यांनी सांगितले, तर सामाजिक-भावनिक शिक्षणामुळे आदिवासी समुदायामध्ये कायमस्वरूपी सकारात्मक बदल होईल, अशी अपेक्षा गर्ल रायझिंगच्या रिचा हिंगोरानी यांनी व्यक्त केली.**

> अभिव्यक्ती प्रकल्प हा आश्रम शाळांमधील सामाजिक-भावनिक शिक्षणात परिवर्तनाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हवामान बदल, लैंगिक समानता यासारख्या गंभीर मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. हा प्रकल्प शालेय शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलांसाठी दिशादर्शक ठरणार आहे.
>
> - नयना गुंडे, आयुक्त आदिवासी विकास विभाग.

# खासगी वाहनांवर पोलिसांचा लोगो

■ अवैध कामे होण्याची शक्यता ■ वाहतूक पोलिसांकडून कारवाईची गरज

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पोलीस कर्मचारी अपाल्या खासगी वाहनांवर सर्रास पोलीस असे लिहितात किंवा पोलिसांचा लोगो असलेले स्टिकर लावतात. अनेकदा पोलिसांव्यतिरिक्त त्यांच्या नातेवाइकांकडून पोलीस या नावाचा गैरवापर केल्याचे प्रकार घडलेले आहेत. पोलीस पाटी लावून खासगी वाहन चालवित असल्याबाबत उच्च न्यायालयाने देखील नाराजी व्यक्त केली आहे. परंतु, यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने सर्वसामान्यांतून नाराजीचे सुर उमटू लागले आहेत.**




जिल्हातील अनेक पोलिसांनी त्यांच्या खासगी वाहनांवर पोलीस पाटी किंवा स्टिकर लावलेले आहेत. परंतु, ते वाहन पोलीस ठाण्यात नेले जात नाही. तसेच, ज्यांचे पत्रकारीताशी काहीच घेणे-देणे नाही अशांनी देखील वाहतूक पोलिसांपासून बचाव करण्यासाठी आपल्या वाहनांवर प्रेस असे लिहून ठेवले आहे. तर, सरकारी कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या नातेवाईकांनी देखील आपल्या खासगी वाहनांवर महाराष्ट्र शासन म्हणून लिहिलेले सर्रास आढळते. सध्या निवडनुकीचे जोरदार वारे वाहत आहेत. याच धामधुमीत राजकीय मंडळींनी दुर्दैवाने जर वाहनांवर अशा पाटी लावून त्या वाहनांमधून अवैधरित्या पैसे आणले तर त्याला जबाबदार कोण असेल, म्हणून तातडीने पोलीस अशी पाटी लावलेल्या गाड्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.

तसेच, डॉक्टर, पत्रकार, पोलिस, महाराष्ट्र शासन, फौजी नावाचा व लोगोचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाईचे निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच, संबंधितावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. असे असून देखील जिल्ह्यात पोलीस नाव किंवा लोगो असलेली वाहने सर्रास दिसत आहेत. अशा वाहनांमार्फत घातपात होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. परंतु, यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. तसेच, अशी वाहने नाकाबंदी व सुरक्षा तपासणी न करताच सोडण्यात येतात. रायगडच्या जिल्हा वाहतूक पोलिसांनी बुलेटच्या सायलेन्सरवर, अवजड अवैध वाहतुकीवर जशी कारवाई केली, तशी कारवाई अशा प्रकारे लोगो लावणाऱ्यांवर करण्याची गरज असल्याचे सर्वसामान्यांकडून बोलले जात आहे.

### अवैध पाट्यांवर कारवाई नाहीच

**पोलिस अधिकारी व अंमलदारांना त्यांच्या खासगी वाहनांवर पोलीस पाटी किंवा पोलिसांचे चिन्ह असलेले स्टिकर्स काढून टाकण्याचे आदेश पोलिस अधीक्षक देऊ शकतात. परंतु, असे अधीक्षक का करत नाही हा संशोधनाचा विषय आहे. गेल्याच महिन्यात समाज माध्यमांवर पोलीस पाटी लावलेल्या गाडीच्या आडून काही तरुण कशाप्रकारे आरेरावी करतात हे सर्वांनीच पाहिलेले आहे. असे होऊन देखील अशा अवैध पाट्यांवर कोणतीच कारवाई होताना दिसत नाही.**

## निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांचा रूटमार्च



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी माणगांव पोलीस यंत्रणा सज्ज झालेली आहे. यावेळी माणगांव पोलिसांकडून बुधवारी (दि.६) माणगाव बाजारपेठ ते बस स्टँड, निजामपूर, इंदापूर तसेच माणगांव पोलीस ठाणे हद्दीत रूटमार्च काढण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज भोसले, नरेंद्र बेलदार यांच्यासह सशस्त्र सीमा बल आसामचे ८ अधिकारी, ४४ जवान, तसेच दंगल नियंत्रण पथक माणगावचे २८ अंमलदार व माणगाव पोलीस ठाण्याचे ४ अधिकार, १५ अंमलदार यांनी रूटमार्चमध्ये सहभाग घेतला होता.

## लोहगड किल्ल्याची प्रतिकृती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील गडकिल्ले आहेत. या गडकोटाचे संरक्षण आणि संवर्धनासाठी कर्जत तालुक्यातील तरुणवर्ग एकवटला आहे. या किल्ल्यांचे महत्व शहरातील सर्वांना व्हावे आणि किल्ले सर्वांनी पहावे या हेतूने कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथील तरुण वर्गाने लोहगड किल्ल्याची प्रतिकृती बनवून सर्वांचे लक्ष वेधले आहे.



कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथील कचेरी रोड भागातील कपालेश्वर गृह निर्माण संस्थेत राहणाऱ्या लहान बच्चे कंपनीने एकत्र येत किल्ले लोहगडाची प्रतिकृती साकारण्याचा निर्णय घेतला होता. विशेष म्हणजे आताच्या डीजीटलच्या युगात देखील बच्चे कंपनी व तरूण मंडळी मोठे किल्ले बनवण्यास पसंती देत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. तसेच, आजही बहुसंख्य गावांमध्ये बच्चे कंपनी आणि तरूण वर्ग किल्ले बनविण्यास पसंती देत असतात. यातच कर्जतच्या तरूण वर्गाने लोहगड किल्ल्याची प्रतिकृती बनवत एक वेगळा आदर्श समोर ठेवत किल्ले संवर्धनाचे महत्व पटवून दिले आहे.

यावेळी या लोहगडाची प्रतिकृती साकारण्यासाठी अंकुश गुप्ता, अनमोल गुप्ता, कुणाल गुप्ता, पवण गुप्ता, देवेश गुप्ता, तुषार गुप्ता, पार्थ गुप्ता, अनिरुध्द कदम, प्रज्ञेश मगर, तेजस सुर्वे, मोहीम जाधव, निनाद जाधव, अक्षय कांबळे तेजस पुरे आदींनी मेहनत घेतली.

## सामाजिक ऐक्याचे अनोखे दर्शन

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील सोगांव येथील मापगांवचे माजी उपसरपंच वसीम कुर यांनी दीपावलीच्या पूर्वसंध्येला हिंदू बांधवांसोबत मिठाईचे वाटप करत सामाजिक ऐक्याचे अनोखे दर्शन घडविले आहे. सोगांव येथील वसीम कुर हे अनेक वर्षांपासून सोगांव पंचक्रोशीतील गरीब आदिवासी बांधवांसह इतर समाजातील बांधवांनाही दिवाळीसह इतर सण मोठ्या आनंदात साजरा करत असतात. यावेळी त्यांनी दिवाळीचे औचित्य साधून सोगांव व चोरोंडे आदिवासीवाडी, सोगांव आगरआळी, बौद्धवाडी, चोरोंडे, मुनवली येथे मोठ्या प्रमाणात मिठाईचे वाटप केले.

यावेळी विजय भगत, मजीद कुर, मुदस्सर कुर, बाबू सोंडे, किफायत कुर, सलमान कुर, स्नेहा रुत, माहिद कुर, आशिष पाटील, अक्षय भगत, अधू भगत, शफी वाकनिस, रमीज कुर, सादिक कुर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रोह्यात भात कापणीला सुरुवात



**। कोलाड । वर्ताहर ।**

रायगड जिल्ह्यासह रोहा तालुक्यात भात शेतीच्या कापणीला दसऱ्यानंतर सुरुवात केली जाते. परंतु, यावर्षी १३ ते २६ ऑक्टोबर पर्यंत विज वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. या पावसामुळे भातशेती आडवी झाली होती. यामुळे पाऊस पुर्णपणे थांबल्यावर दिवाळी नंतरच भात कापणीला खऱ्या अर्थाने सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, यात भात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे.

रायगड जिल्ह्यासह कोलाड-खांब परिसरात प्रामुख्याने भात पीक घेतले जाते. परंतु, पाऊस लांबल्याने भात पिक भुईसपाट झाला आहे. थोडेफार वाचलेलो भात पिक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची भात कापणीची लगबग सुरु झाली आहे. यावर्षी रायगड जिल्ह्यात ९६ हजार हेक्टर क्षेत्रात भात लागवड करण्यात आली होती. यामध्ये सुवर्णा, कोलम, रत्ना, व इतर भात पिकांना शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले होते. यावर्षी हवामान खात्याने अंदाजानुसार पाऊस उत्तम प्रकारे झाला व भात पिक ही चांगले आले. परंतु, परतीचा पाऊस लांबल्यामुळे भात पिके आडवी झाली. तसेच, भात कापणीनंतर २ ते ३ दिवस ऊन देणे आवश्यक असते. यानंतर भारे बांधून मळणी रचली जाते. यामुळे भाताच्या दाण्याला उब मिळते व भाताचा दाणा खरडण्यास मदत होऊन तांदूळ उत्तम प्रकारे मिळते. परंतु, आता निसर्गाचा नियम बदलत चालला असुन पावसाच्या भीतीमुळे भात कापणी लांबणीवर जात असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

## चंद्रकांत खडपे यांचे निधन

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील कातळपाडा - सातिर्जे येथील गणेश चंद्रकांत खडपे यांचे सोमवारी (दि.४) मुंबई येथील आपल्या मुलाच्या घरी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार कातळपाडा येथील मूळगावी करण्यात आले.



यावेळी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी व अंत्ययात्रेत पंचक्रोशीतील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या निधनाबाबत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी बुधवारी (दि.१३) होणार आहेत. तर तेरावे शुक्रवारी (दि.१५) कातळपाडा येथील घरी होणार असल्याचे खडपे कुटुंबियांच्यावतीने सांगण्यात आले आहे.

## राकेश मोरे यांचे निधन

**। खांब । वार्ताहर ।**



रोहा तालुक्यातील रोठ खु. वाघेश्वर नगर येथील रहिवासी राकेश हरिश्चंद्र मोरे यांचे शनिवारी (दि.२) निधन झाले आहे. त्यांच्या अल्पवयीन निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, चुलते, चुलत भाऊ व बहिणी असा परिवार असा परिवार आहे. राकेश दशक्रियाविधी सोमवारी (दि.११) तर अंतिम धार्मिकविधी गुरूवारी (दि.१४) राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- अनुभवी/विना-अनुभवी सिव्हील सुपरवायझर पाहिजेत. ९४२३३७७५७२/९०२८४९३४३४
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (पेमेंट - १२०००) २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण- बामणसुरे, चोंढी नंबर- ९१४५४५०२९७/ ९५७९२५८८९२
- मार्केटिंग करिता स्थानिक अनुभवी प्रतिनिधी पाहिजेत. अलिबाग, कर्जत, खोपोली, माणगाव, महाड salary plus incentive as per experience Send your biodata on WhatsApp number 9769112233

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मतदान जनजागृतीसाठी विशेष मोहीम

## मतदारांना मतदानासाठी आवाहन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तरी सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून निर्भयपणे मतदान करावे, यासाठी रायगड जिल्हा परिषद शाळा-जावळी मतदार जनजागृती अभियान फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जावळी हायस्कूल येथील विद्यार्थ्यांनी सायकल रॅली काढून मतदारांना मतदानासाठी आवाहन केले आले.



यावेळी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो. उठा उठा निवडणूक आली, मतदान करण्याची वेळ झाली. हम सब की एक पुकार, मतदान हमारा अधिकार. नाही विकला जाणार, निर्भय होवून मतदान करणार.अशा घोषणा देत संपूर्ण गावातून फेरी काढून जनजागृती करण्यात आली. सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्प पत्र भरून दिले. गावातील मतदार बंधू आणि भगिनींनी या जनजागृती फेरीला उदंड प्रतिसाद दिला. तसेच, येत्या निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढवून योग्य उमेदवार निवडून देऊ, असे आश्वासन दिले.

या मतदार जनजागृती फेरीसाठी मुख्याध्यापक निलेश उभारे, विद्या लोमटे, सुनिता साजेकर यांनी अतिशय उत्तम नियोजन केले होते. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिया पालकर, सिद्धी पालकर, बाळा पालकर यांनी सहकार्य केले.

## उतेखोलवाडीत शाळेतर्फे प्रभातफेरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील राजिप पी.एम.श्री. उतेखोलवाडी शाळेतर्फे गावातून प्रभातफेरी काढून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. शासनाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत येत्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने नागरिकांमध्ये मतदानासाठी जनजागृती व्हावी यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून शाळेतर्फे जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आला. येथील मुख्याध्यापिका, सर्व शिक्षकवर्ग, विध्यार्थी व ग्रामस्थांनी या मतदानाच्या जनजागृतीपर प्रभात फेरीत सहभाग दाखविला.



## प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद शाळा उतेखोल या ठिकाणी तहसीलदार दशरथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा, असा बॅनर लावून संदेश देण्यात आला.



राज्यातील विधानसभेच्या निवडणूक जाहीर झाल्या असून श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाची निवडणूक येत्या २० नोव्हेंबर रोजी होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने मतदानासाठी जनजागृती म्हणून माणगाव तालुका प्रशासन सज्ज झाला आहे. तुमचं एक मत घडवेल देशाचं भविष्य, असा संदेश माणगावत बॅनर लावून देण्यात येत आहे. राजिप शाळा उतेखोल या ठिकाणी अशाच प्रकारे मतदानासाठी बॅनर लावून मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात आले आहे. यावेळी माणगाव उतेखोल केंद्राचे केंद्र प्रमुख शंकर शिंदे, खर्डी बुद्रूक आदिवासीवाडी शाळेचे शिक्षक दिनेश खडतर, साधन व्यक्ती श्रेया डांगे, दीपाली तांडे, सोनाली तोडकर, ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय माणगाव ग्रंथपाल नम्रता जाधव आदी उपस्थित होते.

## पळसगाव खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्या असून २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत पळसगाव खुर्द आदिवासीवाडी या शाळेतील विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती केली. या अंतर्गत १०० टक्के मतदान व्हावे यासाठी स्वीप कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असून या कार्यक्रमांतर्गत शाळेने प्रभातफेरी, घोषवाक्य, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. सोबत मतदारांनी मतदान करणार असल्याबाबतचे संकल्प पत्र व संदेश पत्र भरून दिले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापक समिती मुख्याध्यापक राजेश पाबरेकर व सहशिक्षिका स्मिता पाबरेकर व सहकार्यांनी विशेष मेहनत घेतली.







## राजिप तेल्याचीवाडी शाळेतर्फे जनजागृती प्रभातफेरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील पळसगाव बुद्रूक केंद्रातील तेल्याचीवाडी या शाळेने मतदान जनजागृती फेरीचे आयोजन केले होते. राज्यामध्ये २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणूक अंतर्गत शाळेच्या परिसरामध्ये विद्यार्थ्यांची मतदान जनजागृतीसाठी प्रभातफेरी काढण्यात आली होती.

यावेळी घरोघरी जाऊन मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास सांगितला. तसेच, संकल्प पत्र व संदेश पत्र वाटप केले. मतदारांना प्रभातफेरीच्या माध्यमातून घोषवाक्याच्या मदतीने मतदानाचे महत्व पटवून दिले. यावेळी शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष, सदस्य, पालक आदी मान्यवर उपस्थितीत होते. मुख्याध्यापिका अनुसया ठाकरे, सहशिक्षिका कामिणी चांगण उपस्थित होत्या.

# महामार्गाच्या कामात धीमा कारभार

## ● खड्ड्यांचे साम्राज्य, धुळीने जीव गुदमरतोय ● खांब, कोलाड ग्रामस्थांचा संताप

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गाला लागलेली साडेसाती दिवसेंदिवस वाढतच आहे. खड्ड्यात रस्ते,की रस्त्यात खड्डे मात्र त्या खड्ड्यांची अशी परिस्थीती निर्माण झाली असून बुजवण्यासाठी टाकलेली खडी व मातीमुळे पावसाला संपताच मुंबई गोवा महामार्गावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे वाहन चालक व प्रवासी अक्षरशः हैराण झाले आहेत तर खांब कोलाड आंबेवाडी नाका, वरसगाव, तळवली, तिसे, रातवड नागरिकांचा जीव धुळीच्या कोंडीमुळे अक्षशः गुदमरत असल्याने येथील नागरिकांनी संताप व्यक्त केला असून खांब,कोलाड,रातवडदरम्यान मार्गाचे काम हे धीम्या गतीने सुरू असल्याने मोठ्या वाहतूकोंडीला वाहन चालकांना सामोरे जावे लागत आहे.



मुंबई-गोवा महामार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली असून खड्ड्यांमुळे तसेच धीम्या कारभारामुळे या महामार्गाची अक्षरशः अवस्था गंभीर झाली आहे. सदरचे खड्डे तात्पुरत्या स्वरूपात बुजवण्याकरिता खडी व मातीचा वापर केला आहे. सुकेळी, खांब,कोलाड, वरसगाव, तिसे, रातवड इंदापूर दरम्यान या मार्गावरील अवजड वाहनांमुळे खड्ड्यातील खडी व रेती बाजूला होऊन धुळ हवेत उडते.तर हवेमध्ये धुळीचे साम्राज्य पसरल्याने समोरील गाडी सुध्दा वाहन चालकाना दिसत नाही. खड्डे भरण्याकरिता वापरण्यात आलेल्या रेती, खडीवरून मोटारसायकल घसरून अपघाताचे ही प्रमाण वाढले असल्याचे समचले तर हवेत प्रदुषित होत असलेली धूळ त्यात जीव गुदमरत असल्याने येथील नागरिकांनी एकच संताप व्यक्त केला आहे.तर कोलाड आंबेवाडी चौकात तर मोठी वाहतूक कोंडी तर उड्डाण पुलाचा धीम्या कारभारामुळे बाजार खरेदीसाठी येत असलेला प्रवासी नागरिकांना रस्ता ओलांडताना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर धुळीवर तात्पुरता दिलासा देणारी पाण्याची फवारणी प्रवासी वर्गाला अधिक चिखलमय आणि रस्त्याभर पसरलेल्या खडीमुळे प्रवास धोकदायक ठरत आहे, तसेच कुंडलिका नदी पात्राच्या पुलातोंडवर कॉंक्रिटीकरणाचे काम धीम्या गतीने सुरू आहे, त्यामुळे कोलाड पोलिस ठाण्यासमोर तर भले मोठे खड्डे पडले असल्याने दुचाकीवर प्रवास करणारे प्रवासी त्यात आदळून आपघात होत असल्याचे समजते, परंतु याबाबत सदरील ठेकेदारास सांगूनदेखील हे खड्डे बुजविण्यास टाळाटाळ करीत असल्याचे बोलले जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेली सतरा वर्षे रखडले आहे, तर या मार्गाची राज्यासह देशात तसेच जगभरात बोंब सुरू आहे तर किती सरकारं आली आणि गेली त्यात ठेकेदारही दरवेळेला बदलले कोट्यवधी रूपये खर्च झाले, मात्र मार्ग काही होईना कोकण वाशीयांचा प्रवास काय सुखरकर होईना. गणेश उत्सव काळात दस्तुरखुद्द राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पावसात महामार्गाची दुरवस्थेची पाहणी दौरा केला तसेच बांधकाम मंत्री महोदयदेखील वेळोवेळी पाहणी करून जात होते, मात्र नागोठणे-इंदापूरदरम्यानचे काम जैसे थे. तर कामात धीम्या गतीला जबादर कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे.तर कोलाड आंबेवाडी नाक्यावरील चौकातील उड्डाण पुलाचे काम लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू केले, मात्र निवडणुकीनंतर त्या कामालाही संतगती लागल्याने दोन्ही बाजूला वाहतूक कोंडी निर्माण होत आहे, तसेच तेथील रस्त्यामार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्याने धुळीच्या कोंडीत असंख्ये प्रवासी नागरिकांचा जीव गुदमरत असल्याचा संताप ऐन दिवाळनिमित्त बाजारात खरेदीसाठी आलेल्या प्रवासी वर्गातून केला जात होता.

> एक तप पूर्ण होऊन गेला एवढ्या वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतरही हा राष्ट्रीय महामार्ग तयार होत नाही. कित्येक बळी या मार्गावरील अपघातात गेले आहेत. गेली कित्येक दिवस खांब आणि कोलाड आंबेवाडी नाक्यावरील धुळीचे प्रदूषण सुरु आहे. यावर संबंधित खात्याकडून लवकरात लवकर उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी सर्व सामान्य जनतेकडून केली जात आहे.
> – अलंकार खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते, खांब कोलाड

## फटाके वाजवण्याच्या कारणावरून मारहाण

**पनवेल :** फटाके वाजवण्याचा कारणावरून झालेल्या बाचाबाची मध्ये लाथा बुक्क्याने मारहाण केल्याप्रकरणी ११ अनोळखी इसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विकासवाडी, देवद येथे राहणारे ४२ वर्षीय इसम हे पत्नीसह मोटरसायकल वरून घरी परत येत होते. ते त्रिमूर्ती शरण सोसायटी समोर आले असता एक मुलगा फटाके वाजवत होता. त्या फटाक्याची ठिणगी अंगावर आल्यामुळे फटाके हवेत उडू नको असे ते बोलले. यावेळी त्या मुलाने शिवीगाळ केली. यावेळी त्या मुलाची आई तेथे आली आणि त्या दोघांत बाचाबाची झाली. यावेळी त्या महिलेने त्यांच्या पत्नीच्या कानाखाली मारली. याविरोधात पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

## साजगावच्या यात्रेची जय्यत तयारी

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरात पेण कोळीवाडा आणि साजगाव यात्रा यांचा परस्परांचे संबंध जवळपास ३५० वर्षापासून आहे. साजगावच्या यात्रेला बोंबल्या विठोबाची यात्रा मान्यता प्राप्त प्रसिध्दी आहे. १५ दिवस चालणारी कोकणातील ही एकमेव यात्रा असून, सुक्या मच्छीसाठी ही प्रसिध्द यात्रा आहे. पेण कोळीवाड्यात या यात्रेसाठी लागणारी सुकी मच्छी साठवणूक करण्याची लगबग सुरु आहे.



१२ नोव्हेंबर (कार्तिकी एकादशी) ते २७ नोव्हेंबर (उत्पत्ती एकादशी) यादरम्यान बोंबल्या विठोबाची यात्रा असून, पेण कोळीवाड्यातून कमीत कमी ४० कुटुंबिय आपली सुक्या मच्छीची दुकाने घेऊन जाणार आहेत. प्रत्येक कुटुंबातील कोळी बांधवांनी १० लाखांच्या आसपास सुक्या मच्छीची साठवणूक केली असून, त्याला मीठ लावून व्यवस्थित ठेवण्याचे कामदेखील सुरु आहे. खारवलेल्या मच्छीमध्ये बांगडा, सुरमई, ढोमे, शिंगाला ही मच्छी आहे तर सुक्या मच्छीमध्ये बोंबील, सुकट, सोडे, दांडी सुकट, आंबाडी सुकट, मोंदोले, वाकटी, माकली यांचा समावेश आहे.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गंगेश नाईक यांनी सांगितले की, आम्ही जवळपास ४० दुकाने पेण कोळीवाड्यामार्फत साजगावच्या यात्रेत लावणार आहोत. प्रत्येक दुकानदाराची खरेदी १० लाखांच्या आसपास आहे. १५ दिवसांच्या या यात्रेमध्ये जर मध्येच सुकी मच्छी संपली तर आम्ही सातपाटी, मनोहर आदी ठिकाणाहून तातडीने मच्छी आणत असतो. १५ दिवसांत जवळपास ५ ते ६ कोटींची उलाढाल फक्त मच्छी विक्रीतून होत असते. पेण कोळीवाड्यामध्ये सध्या एकच लगबग सुरु आहे.

## वैशाली पांडे पुरस्काराने सन्मानित



**। पाली । वार्ताहर ।**

तालुक्यातील श्रीराज एज्युकेशनल सेंटरच्या मुख्याध्यापिका प्रा. वैशाली पांडे यांना नुकतेच महाराष्ट्र राज्यस्तरीय प्रादेशिक शिक्षक संघटनेतर्फे आदर्श प्राचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्थरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

प्रा. वैशाली पांडे यांची शैक्षणिक व व्यावसायिक कारकीर्द अतिशय देदीप्यमान व प्रभावी आहे. त्यांनी भौतिक शास्त्र या विषयात पोस्ट ग्रेड्युएशन केल्यानंतर शिक्षण क्षेत्रात करिअर करण्याचा ध्यास घेऊन वैशाली पांडे यांनी कॉम्प्युटर सॉफ्टवेअर पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा घेतला, सोबतच शिक्षणाशास्त्र पदवी घेतली. आणि नागपूरमधील इन्स्टिट्यूट ऑफ सायंस कॉलेजमध्ये त्यांची भौतिक शास्त्र या विषयाच्या प्राध्यापिका म्हणून नेमणूक झाली. नंतर त्यांनी या नामांकित संस्थेत काम पाहिले. यासोबत त्यांचा पुढील अभ्यासाचा आणि सर्वांगीण विकासाचा ध्यास सुरूच होता. त्यातून त्यांनी वेदांग ज्योतिष आणि वास्तुशास्त्र या विषयात मास्टर्स डिग्री मिळवून वेदिक गणित आणि स्त्रियांचे सशक्तीकरण करण्याच्या ध्यासाने कार्य सुरु केले. अशाच उत्तम वाटचालीतून जवळपास वीस वर्षांचा अनुभव मिळाल्यानंतर त्यांना हिरानंदानी फाऊंडेशन अँड हिरानंदानी इंटरनॅशनल पवई मुंबई या अग्रगण्य संस्थेत हेड ऑफ सायंस डिपार्टमेंट या मोठ्या पदावर कामं करण्याची संधी मिळाली. जवळपास वीस-बावीस वर्षे अशा मोठ्या मेट्रो सिटीजमध्ये मोठया पदांवर काम करून ही शिक्षण क्षेत्राची आवड आणि सम ाजाचं देणं लागतो ही भावना मनात रुजू असल्यामुळे त्यांनी पुढील कार्यक्षेत्र ग्रामीण भागातील निवडलं. मलकापूर येथील यशोधाम पब्लिक स्कुलमध्ये शैक्षणिक प्रमुख म्हणून कामं पाहू लागल्या. त्या संस्थेतील उल्लेखनिय कार्य म्हणजे सामान्य मुलांसाठी वायपीएस ही अकॅडमी चालू करणे. वायपीएस अकॅडमी हे जेईई, एनईईटी आणि सीए फाउंडेशन कोर्सेसच्या कोचिंगसाठी अतिशय परवडणाऱ्या फीमध्ये होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी, वैद्यकीय, सीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी जावे, हा एकच उद्देश होता.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती, विद्यमान मिळकत मालक श्रीमती मीरा महेंद्र पाटील व इतर २ यांचेकडून त्यांचे खालील वर्णनाची मिळकत रजिस्टर दस्ताऐवजाने विकत घेण्याची ठरवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. मुकटे, ता. रोहा, जिल्हा - रायगड**

| गावाचे नाव व तालुका | स.नं./गट क्र. | क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे. मुकटे ता. रोहा | गट क्र. ७०/१ (जुना स. नं. १३ व ३०/६) | क्षेत्र-०-४९-० हे आर पो.ख.-२-६३-०० हे.आर. एकुण क्षेत्र-३-१२-०० हे.आर. पैकी ०-४९-०० हे. आर. | १.९१ |

सदरच्या मिळकती ह्या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदर मिळकती मधील बांधकामासह, लहान-मोठी झाडे, अंर्तभूत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, गहाण, कुळवहिवाट, दान, बक्षिसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अ‍ॅटॅचमेंट किंवा मिळकतीतून येण्याजाण्याचा मार्ग वगैरे तसेच होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार अ‍ॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलास नंतर ही मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

कळावे
दि. ०६/११/२०२४

अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट
**(अ‍ॅड. श्वेता अमित नारे)**
गंगासागर बिल्डिंग, बी विंग,
पहिला मजला, घुमकरवाडी जवळ,
कलेक्टर ऑफिस रोड, अलिबाग. ४०२२०१
मो. नं. ९५२७११८८००

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकती, विद्यमान मिळकत मालक श्री. राजेंद्र हरीश्चंद्र मोकल व इतर १ यांचेकडून त्यांचे खालील वर्णनाची मिळकत रजिस्टर दस्ताऐवजाने विकत घेण्याची ठरवली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. मुकटे, ता. रोहा, जिल्हा - रायगड**

| गावाचे नाव व तालुका | स.नं./गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे. मुकटे ता. रोहा | गट क्र. ७०/१ (जुना स. नं. १३ व ३०/६) | क्षेत्र ०-४९-० हे. आर. पो.ख. २-६३-०० हे.आर. एकुण क्षेत्र-३-१२-०० हे.आर. त्यापैकी २-६३-०० हे.आर. | १.९१ |
| मौजे. मुकटे ता.रोहा | गट क्र.७०/२ (जुना स. नं.१३ व ३०/६) | क्षेत्र-६-००-० हे.आर. पो.ख-०-००-० हे.आर. एकूण क्षेत्र-६-००-० हे.आर. (संपूर्ण क्षेत्र) | ३.९७ |

सदरच्या मिळकती ह्या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहीवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदर मिळकती मधील बांधकामासह, लहान-मोठी झाडे, अंर्तभूत हक्क व हितसंबंधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत इतर कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, गहाण, कुळवहिवाट, दान, बक्षिसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अ‍ॅटॅचमेंट किंवा मिळकतीतून येण्याजाण्याचा मार्ग वगैरे तसेच होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार अ‍ॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्या सह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलास नंतर ही मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

कळावे
दि. ०६/११/२०२४

अशिलातर्फे अ‍ॅडव्होकेट
**(अ‍ॅड. श्वेता अमित नारे)**
गंगासागर बिल्डिंग, बी विंग,
पहिला मजला, घुमकरवाडी जवळ,
कलेक्टर ऑफिस रोड, अलिबाग ४०२२०१
मो. नं. ९५२७११८८००

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२५ सालासाठी डायऱ्या तीन प्रकारच्या नमुन्यात बँकेच्या माहितीच्या तपशिलासह छापून घ्यावयाच्या आहेत.

१. व्ही.आय.पी. एक्झीक्युटीव्ह.
२. मध्यम आकाराची
३. लहान आकाराची

तरी अशा तीनही प्रकारच्या डायऱ्या, बँकेच्या माहितीच्या तपशिलासह छपाई करण्याच्या असून सदरच्या छपाईसह डायऱ्यांची निविदा मागविण्यांत येत आहे. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक ०७.११.२०२४ ते दिनांक १४.११.२०२४ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे खाली सही करणार स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

केंद्र कार्यालय अलिबाग — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
दिनांक : ०७.११.२०२४

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२५ सालाकरीता कॅलेंडर्स छपाई करून घेणेचे आहेत. कॅलेंडर्स छपाई करून घेणेकरता जिल्ह्यातील सहकारी मुद्रक संस्थांकडून तसेच संबंधीत व्यवसायिकांकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.

कॅलेंडर्सचा सविस्तर तपशिल बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक ०७.११.२०२४ ते दिनांक १४.११.२०२४ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

केंद्र कार्यालय अलिबाग — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
दिनांक : ०७.११.२०२४

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### दी नॅशनल को- ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

**नोंद. कार्यालय:** २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉइंट, मुंबई- २१.
**वसुली विभाग:** प्लॉट क्र.-८/सी, सेक्टर-१३, १ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प)-४१०२०६.
**फोन क्र.** ०२२-२७४५८६२८ **ईमेल.** recovery@ncbmumbai.com,

**शुद्धीपत्रक**

दि.०६.११.२०२४ रोजी कृषीवल या वर्तमानपत्रामध्ये पृष्ठ क्र. २ वर प्रसिध्द झालेल्या लिलाव विक्रीची सूचनेचा संदर्भ घेवून अटी आणि शर्ती मधील दुसरा क्रमांक चुकीचा छापला गेला आहे तर तो खालील प्रमाणे वाचावा.

२. लिलावाच्या दिवशी बोलीत भाग घेण्यासाठी बोलीदाराने व्यक्तिश: हजर राहावे आणि मुंबई येथे देय दी नॅशनल को- ऑप. बँक लिमिटेड च्या नावे काढलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्युल्ड बँकेच्या पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट किंवा आरटीजीएस/एनईएफटीच्या माध्यमातून येथे वर वर्णन केलेल्या इ.अ.र. सह मोहोरबंद पाकिटातून बोली सौ. सुष्मा के. प्रकाशे करिता २६.११.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० पूर्वी आणि श्री. भुपींदर सिंग सॉहनी व मे. दमन अ‍ॅग्रो मार्फत प्रोपराईटर-श्री. भुपींदर सिंग सॉहनी करिता ०९.१२.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सायं. ५.०० पूर्वी दी नॅशनल को-ऑप. बँक लि., वसूली विभाग, कल्याण शाखा, घोडबंदर शाखा कार्यालयात प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे पाहोचली पाहिजे.

*उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास/आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.

**जाहिरातीमध्ये इतर मजकूर अपरिवर्तनीय राहिल.**

### Change in Name

I Say that My correct Name is ARPITA PRAVIN KAMBLE in my all eductional certificates and Adhar card. But in my old passport they recorded my name wrongly APRITA PRAVIN KAMBLE .
So please correct My name in my New passport as a ARPITA PRAVIN KAMBLE
SR.No. 9435

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कुंभे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरवीले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे कुंभे, ता. कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|
| श्री. महेश मनोहर सालफळे | १५ | १ | ०-२५-०० | २-६० |

वरील मिळकती हया आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. ७/११/२०२४.
**अ‍ॅड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००
९२७२५६२१५८.

**अ‍ॅड. दिपक रखमाजी पादीर**
मु. पो. नेरळ (मोहाचीवाडी),
ता. कर्जत, जि. रायगड
मो.- ९८५०७६७५६८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक गोपीनाथ दिनकर भगत व इतर २ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे वरई तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३४ | एकुण क्षेत्र ०-४५-३० हे आर पॉ | २-६० |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०७/११/२०२४ — **अ‍ॅड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर.
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, श्रीमती तेजल तुषार म्हात्रे यांच्या मालकीची मोजे सारळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील भूमापन नं.३९, क्षेत्र ०-३३-८० (हे. आर.) पोट खराबा ०-०३-१० (हे. आर. ) एकूण क्षेत्र ०-३७-१० (हे. आर.) आकार ९.९४ (रू.पै.) या मिळकतीपैकी दक्षिण-पूर्व कोपऱ्यातील ०-०२-०० (हे. आर.) एवढे क्षेत्राची मिळकत विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबत वर नमूद विद्यमान मालकांनी सांगितले आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे कोणताही, कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : ०६.११.२०२४.

**(अ‍ॅड. संदेश जगन्नाथ म्हात्रे)**
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वनविभाग**
**उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश मुंबई यांचे कार्यालय**
डी.डी. बिल्डींग. १ ला मजला जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग,
फोर्ट मुंबई - ४००००१, फोन नं. २२६६०६५२, २२७०१७३८
E-Mail : ddirmumbai@gmail.com

**जाहीर नोटीस** क्र.पुनरिक्षण अर्ज क्र. ३८२/२०२४
मुंबई, दिनांक :-२३/१०/२०२४

प्रति,
श्रीमती बयोबाई सहादेव पवार
रा. तुर्भे बुद्रुक, ता. पोलादपूर, जि. रायगड ७०२३०३
तर्फे कुल अखत्यारी श्रीमती शितल सहदेव गोळे — अपीलदार
रा. तुर्भे बुद्रुक, ता.पोलादपूर, जि. रायगड आणि
सध्या मु.शेणगांव, ता. खालापूर, जि. रायगड ४१०३०१
विरूद्ध
१) उपअधिक्षक भुमी अभिलेख, पोलादपूर — जाबदार
२) श्री. शांताराम श्रीधर गोळे
रा. तुर्भे बुद्रुक, ता.पोलादपूर, जि. रायगड ४०२३०३

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज**

मौजे तुर्भे बुद्रुक, ता. पोलादपूर येथील नवीन सर्व्हे नं. ११६/१ (जुना स.नं.१६९/१) या मिळकतीबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, रायगड यांचेकडील क्र. अपील/एस आर ६८/२०२३/ता. पोलादपूर/जि. रायगड/२०२४, दि.४/४/२०२४ निर्णयाविरुद्ध पुनरिक्षण अर्ज दाखल केलेला असून त्यामधील अपीलदार व जाबदार यांना दि. २९/८/२०२४, १२/९/२०२४, १०/९/२०२४ रोजीच्या आगावू नोटीशीने कळवून त्यामधील जाबदार क्र. २ यांना त्यांचे पत्यावर पाठविलेली सुनावणीची नोटीस बजावली गेली नसल्यामुळे, तसेच अपील एस. आर. ३८२/२०२४ चे प्रकरणी दिनांक १४/१०/२०२४ रोजीच्या सुनावणीस जाबदार क्र. २ हे गैरहजर असल्याने सदरच्या मिळकतीबाबत जाबदार यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाने किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी दि.९/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई, डी.डी. बिल्डींग,१ ला मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग, फोर्ट मुंबई- ४००००१ या पिठासनासमोर हजर राहून आपले म्हणणे मांडावे, अन्यथा त्यांचे काही म्हणणे नाही असे समजून त्यांचे अनुपस्थितीत पुनरिक्षण अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी.
जाबदार यांना अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तुत पुनरिक्षण अर्ज प्रकरणी सुनावणीकामी हजर रहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध केली असे.

सही/-
**(जयंत निकम)**
**उपसंचालक भूमि अभिलेख,**
**कोंकण प्रदेश मुंबई**

**निवडक**

### खेळाडूंवरील ट्रोलिंग थांबेल

**नवी दिल्ली :** महिला क्रिकेटर्सना सोशल मीडियावर ट्रोलिंग आणि त्यांच्यावर चुकीच्या कमेंट्स रोखण्यासाठी आयसीसीने तयारी केली आहे. गोबल ॲपच्या मदतीने आता खेळाडूंवरील चुकीच्या कमेंट्स आपोआप डिलीट केल्या जातील. खेळाडू आणि संघाच्या सोशल मीडिया अकाउंटवर आक्षेपार्ह शब्द असलेल्या कमेंट लपवल्या जातील.महिला क्रिकेटपटूंकडून सतत तक्रारी आल्यानंतर आयसीसीने गेल्या महिन्यात महिला २० विश्वचषक स्पर्धेत टूलची चाचणी घेतली होती.

### मैदानावर कोसळली वीज

**नवी दिल्ली :** क्रीडाक्षेत्रात कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे तुम्ही अनेक खेळाडूंचा मृत्यू झाल्याच्या बातम्या तुम्ही ऐकल्या असतीलच, पेरूमध्ये फुटबॉल सामन्यादरम्यान विजेचा धक्का लागून एक भीषण अपघात घडला. त्यामुळे एकाचा जागीच मृत्यू झाला. सामन्यादरम्यान अनेक खेळाडूंवर वीज पडली. अपघातात बचावपटू जोस ह्यूगो डे ला क्रूझ मेझा यांचा मृत्यू झाला. या सामन्यात पंचांव्यतिरिक्त विजेच्या धक्क्याने गंभीर जखमी झालेल्या इतर खेळाडूंना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

### इंग्लिश हंगामी कर्णधार

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक फलंदाज जोश इंग्लिशला ऑस्ट्रेलियन संघाचा हंगामी कर्णधार बनवण्यात आले आहे. इंग्लिश एकदिवसीय क्रिकेटमधील ३० वा आणि टी-२० मधील १४वा कर्णधार ठरला आहे. मुख्य निवडकर्ता जॉर्ज बेली यांनी बुधवारी रात्री सांगितल की, जोश हा वनडे आणि टी-२० संघाचा महत्त्वाचा सदस्य आहे. मैदानात आणि मैदानाबाहेर त्यांचा खूप आदर आहे. त्याने ऑस्ट्रेलिया अ संघाचे कर्णधारपद भूषवले आहे.

### वॉर्नरला थंडरचे कर्णधारपद

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियाचा माजी स्फोटक फलंदाज डेव्हिड वॉर्नरला बिग बॅश लीगमध्ये कर्णधारपद मिळालं आहे. डेव्हिड वॉर्नर बीबीएल २०२४-२५ मध्ये सिडनी थंडर संघाचं नेतृत्व करताना दिसेल. सिडनीनं आगामी हंगामासाठी वॉर्नरची कर्णधार म्हणून निवड केली आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियानं सुमारे सहा वर्षांपूर्वी २०१८ मध्ये डेव्हिड वॉर्नरवर कर्णधारपदाची आजीवन बंदी घातली होती. केपटाऊन कसोटीत वॉर्नर बॉल टॅम्परिंगप्रकरणी दोषी आढळल्यानंतर त्याला ही शिक्षा दिली होती.

### ‘भारत पुनरागमन करेल’

**सिडनी :** न्यूझीलंडविरुद्धच्या दारुण पराभवामुळे भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास खालावला असेल. मात्र, त्यांच्यातील दमदार पुनरागमनाची क्षमता आम्हाला ठाऊक आहे. त्यांना कमी लेखण्याची चूक आम्ही निश्चितपणे करणार नाही, असे वक्तव्य गोलंदाज जोश हेझलवूडने केले. ते थोडे संभ्रमात असतील. आम्हाला याचा निश्चितपणे फायदा होऊ शकेल. आम्ही त्यांना कमी लेखण्याची चूक करणार नाही, असे हेझलवूड म्हणाला.

# २४,२५ नोव्हेंबरला आयपीएल लिलाव

## एक नव्हे दोन दिवस चालणार महालिलाव; १४७५ खेळाडूंचा समावेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल गव्हर्निंग काऊन्सिलने इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामापूर्वी आयपीएलच्या मेगा लिलावाच्या तारखांची अधिकृत घोषणा केली आहे. यावेळी खेळाडूंचा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. सौदी अरेबियामध्ये जेद्दा शहरात हा मेगा लिलाव होणार आहे. ३१ ऑक्टोबर रोजी, सर्व १० आयपीएल फ्रँचायझींनी त्यांच्या कायम ठेवलेल्या खेळाडूंच्या नावांची घोषणा केली होती, त्यामुळे यंदाच्या लिलावात अनेक मोठी नावे यावेळी लिलावाचा भाग असतील. यामध्ये सर्व संघांसह एकूण २०४ खेळाडूंच्या जागा रिक्त आहेत.

आयपीएलचा आगामी मेगा लिलाव खूपच रोमांचक होणार आहे, ज्यामध्ये ऋषभ पंत, केएल राहुल आणि श्रेयस अय्यर सारखे अनेक मोठे खेळाडू उतरणार आहेत, त्यामुळे त्यांच्यासाठी मोठ्या बोली लावल्या जातील हे निश्चित आहे. यावेळी सर्व १० फ्रँचायझींनी मिळून एकूण ४६ खेळाडूंना रिटेन केले आहे, ज्यांची नावे ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली होती.

२४ आणि २५ नोव्हेंबरला आयपीएल मेगा लिलाव आयोजित केला जात आहे, त्या दरम्यान भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर पर्थमध्ये पहिला कसोटी सामना खेळणार आहे आणि तिसऱ्या आणि चौथ्या दिवसाचा खेळ खेळवला जात असताना हा लिलाव होणार आहे. याआधी २०२४ मध्ये दुबईत आयपीएलचा मिनी लिलाव झाला होता. ४ नोव्हेंबर २०२४ रोजी खेळाडूंची लिलावासाठीची नोंदणी अधिकृतपणे बंद झाली. एकूण १५७४ खेळाडूंनी (१,१६५ भारतीय आणि ४०९ विदेशी) मेगा २०२५ लिलावामध्ये सहभागी झाले आहेत.

या खेळाडूंमध्ये ३२० कॅप्ड खेळाडू आहेत, १२२४ अनकॅप्ड खेळाडू तर ३० खेळाडू हे असोसिएट देशांचे आहेत.

**खेळाडूंची यादी**

- भारतीय कॅप्ड खेळाडू ४८
- विदेशी कॅप्ड खेळाडू २७२
- आयपीएलचा पूर्वीही भाग असलेले अनकॅप्ड भारतीय खेळाडू १५२
- आयपीएलचा पूर्वीही भाग असलेले अनकॅप्ड आंतरराष्ट्रीय खेळाडू ३
- अनकॅप्ड भारतीय खेळाडू ९६५
- अनकॅप्ड आंतरराष्ट्रीय खेळाडू १०४



**आयपीएल लिलावातील परदेशी खेळाडूंच्या लक्षणीय संख्येने वेधले लक्ष, परदेशी संघातील खेळाडू**

- अफगाणिस्तान २९ खेळाडू
- ऑस्ट्रेलिया ७६ खेळाडू
- बांगलादेश १३ खेळाडू
- कॅनडा ४ खेळाडू
- इंग्लंड ५२ खेळाडू
- आयर्लंड ९ खेळाडू
- इटली १ खेळाडू
- नेदरलँड्स १२ खेळाडू
- स्कॉटलंड २ खेळाडू
- दक्षिण आफ्रिका ९१ खेळाडू
- श्रीलंका २९ खेळाडू
- युएई- १ खेळाडू
- अमेरिका १० खेळाडू
- वेस्ट इंडिज ३३ खेळाडू
- झिम्बाब्वे ८ खेळाडू

# आयसीसी क्रमवारीत रिषभ पंतची धमाल

## रोहित-कोहली टॉप २० मधून बाहेर!

**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

नुकत्याच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारतीय संघाचा ३-० असा क्लीनस्वीप झाला असला, तरी रिषभ पंतची फलंदाजी भारतासाठी सकारात्मक होती. कार अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर सुमारे १ वर्ष क्रिकेटपासून दूर राहिलेल्या पंतनं कसोटी क्रिकेटमध्ये दमदार पुनरागमन केलं आहे.

रिषभ पंतनं न्यूझीलंडविरुद्धच्या शेवटच्या कसोटीच्या दोन्ही डावांत अर्धशतकं झळकावली, ज्याचा त्याला रँकिंगमध्ये फायदा झाला आहे. आयसीसीनं जाहीर केलेल्या ताज्या कसोटी क्रमवारीत पंतनं जबरदस्त झेप घेतली. तो आता पुन्हा कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंग गाठण्याच्या अगदी जवळ आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत एका धावेनं शतक हुकलेला पंत दुसऱ्या कसोटीत अपयशी ठरला होता. असं असूनही तो टॉप-१५ मध्ये कायम राहिला. शेवटच्या कसोटीतील दमदार कामगिरीच्या जोरावर त्यानं पाच स्थानांनी झेप घेतली असून तो आता सहाव्या स्थानावर पोहोचला आहे. रिषभ पंत फेब्रुवारी २०२२ मध्ये कसोटी क्रमवारीत पाचव्या स्थानावर पोहोचला होता, ही त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम रँकिंग आहे. आता पाचव्या क्रमांकावर असलेल्या स्टीव्ह स्मिथ आणि पंत यांच्या रेटिंगमध्ये केवळ सात गुणांचा फरक आहे.

गेल्या आठवड्यातील क्रमवारीत टॉप २० मधून बाहेर पडलेला रोहित शर्मा आणखी दोन स्थानांनी घसरला आहे. याशिवाय विराट कोहलीही टॉप-२० मधून बाहेर पडला आहे. कोहली आता २२व्या तर रोहित २६व्या क्रमांकावर आहे



# विराट कोहली ऑस्ट्रेलियात इतिहास रचणार

**।नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेला २२ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेची अनेक दिवसांपासून क्रिकेट चाहते वाट पाहत आहेत. मालिकेतील पहिली कसोटी पर्थ येथे होणार आहे. यानंतर ॲडलेड, ब्रिस्बेन, मेलबर्न आणि सिडनी येथे चार सामने खेळवले जातील. या मालिकेत सर्वांच्या नजरा भारताचे दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यावर असतील. दोघेही करिअरच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. अशा परिस्थितीत घरच्या मैदानावर बांग्लादेश आणि न्यूझीलंडविरुद्ध केलेल्या लाजिरवाण्या कामगिरीनंतर सर्वांच्या नजरा या दोघांकडे लागल्या आहेत. कोहलीला गेल्या १० डावात केवळ १९२ धावा करता आल्या आहेत.

आता त्याला ऑस्ट्रेलियातही विशेष कामगिरी करण्याची संधी आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक धावा करणाऱ्या परदेशी फलंदाजांच्या यादीत तो ब्रायन लाराला मागे टाकू शकतो. याशिवाय जर त्याचा दौरा चांगला गेला तर तो महान भारतीय फलंदाज सचिन तेंडुलकरला मागे टाकेल.

ब्रायन लाराने ऑस्ट्रेलियात १९ कसोटी सामने खेळले आहेत. ज्यात ३५ डावात १४६९ धावा केल्या आहेत. ज्यात त्याने ४ शतके आणि ४ अर्धशतकेही झळकावले आहेत. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक धावा करणाऱ्या परदेशी खेळाडूंमध्ये तो दहाव्या क्रमांकावर आहे. विराटला हे स्थान मिळवण्याची सुवर्णसंधी आहे. त्याने ऑस्ट्रेलियात १३ सामन्यांच्या २५ डावात १३५२ धावा केल्या आहेत. लाराला मागे टाकण्यासाठी विराटला ११८ धावा कराव्या लागतील.सचिनबद्दल बोलायचे झाले तर त्याने २० सामन्यांच्या ३८ डावात १८०९ धावा केल्या आहेत. त्याने ६ शतके आणि ७ अर्धशतके केली आहेत. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक धावा करणाऱ्या परदेशी खेळाडूंच्या यादीत तो चौथ्या क्रमांकावर आहे. या बाबतीत इंग्लंडचा जॅक हॉब्स आघाडीवर आहे. त्याने २४ सामन्यात २४९३ धावा केल्या आहेत. कोहलीला सचिनला मागे टाकायचे असेल तर त्याला ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेत ४५८ धावा कराव्या लागतील. विराटसाठी ही फार मोठी गोष्ट नाही. पण त्याचा सध्याचा फॉर्म पाहता त्याला यासाठी जबरदस्त पुनरागमन करावे लागणार आहे.कोहलीने २०११ पासून कांगारूंविरुद्ध २५ कसोटी सामने खेळले आहेत. ज्यात ४७.४८ च्या सरासरीने विराटने २०४२ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये ८ शतके आणि ५ अर्धशतके आहेत. तसेच कोहलीची ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्वोच्च धावसंख्या १८६ धावा आहे.



# विराट-बाबर आणि रोहित-रिजवान एकाच संघात खेळणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जवळपास दोन दशकांनंतर आफ्रो-आशिया चषक पुन्हा सुरू करण्याची योजना आहे. यामध्ये आशिया इलेव्हन आणि आफ्रिका इलेव्हन यांच्यात मर्यादित षटकांचे सामने होतील. आफ्रिकन क्रिकेट असोसिएशनने आपल्या वार्षिक परिषदेत ही स्पर्धा पुन्हा सुरू करण्याबाबत चर्चा केली. यामध्ये सहा सदस्यांची अंतरिम समितीही स्थापन करण्यात आली आहे. आफ्रिकन खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक स्पर्धात्मक संधी निर्माण करणे हा या समितीचा उद्देश आहे.





ही स्पर्धा पुन्हा झाल्यास भारतीय आणि पाकिस्तानी खेळाडूंना एकाच संघात खेळताना पाहण्याची दुर्मिळ संधी मिळेल. ते सध्या फक्त आयसीसी टूर्नामेंटमध्ये एकमेकांविरुद्ध खेळतात. प्रेक्षकांसाठी ही मोठी पर्वणी असेल. या स्पर्धेत विराट कोहली, बाबर आझम, रोहित शर्मा आणि मोहम्मद रिझवान सारखे खेळाडू एकाच संघात खेळू शकतात.

‘आफ्रो-आशिया चषक हा आर्थिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे. दोन्ही खंडांतील खेळाडू आणि प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्साह आहे,फक्त असं आफ्रिकनं क्रिकेट असोसिएशनचे अंतरिम अध्यक्ष आणि झिम्बाब्वे क्रिकेटचे अध्यक्ष तवेंगा मुखलानी म्हणाले. आशियाई क्रिकेट परिषदेकडून अद्याप या स्पर्धेवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली तरी ही स्पर्धा पुन्हा सुरू होण्याची दाट शक्यता आहे. आफ्रो-आशिया चषक आतापर्यंत फक्त दोन वेळा खेळला गेला आहे. २००५ मध्ये दक्षिण आफ्रिकेत आणि २००७ मध्ये भारतात याचं आयोजन करण्यात आलं होतं. २००५ आफ्रो-आशिया कपमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली गेली होती, ज्यामध्ये एक सामना पावसामुळे रद्द झाला आणि उर्वरित सामन्यांनंतर मालिका १-१ अशी बरोबरीत राहिली. तर २००७ च्या स्पर्धेत आशिया इलेव्हननं तिन्ही सामने जिंकले होते. २००९ साली केनियामध्ये या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

# सिद्धेश लाडची सॉलिड सेंच्युरी

**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

ओडिसाविरूद्धच्या सामन्यात सलामीवीर अंगक्रिश रघुवंशीचे शतक हुकले. पण, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या सिद्धेश लाड व श्रेयस अय्यरने दमदार शतक ठोकले.

श्रेयश अय्यरने १०१ चेंडूत १०० धावांची खेळी केली तर सिद्धेशने १९५ चेंडूत शतक लगावले. दोघांनी शतकी खेळी करत मुंबईची धावसंख्या ३०० पार घेऊन गेले आहेत, ज्याममध्ये अंगक्रिश रघुवंशीच्या ९२ धावांच्या खेळीचेही योगदान आहे.

मुंबईने आयुष म्हात्रेच्या (१८) रूपाने पहिला विकेट १९ धावांवर गमावला. सलामीवीर पृथ्वी शॉच्या जागी संघात आलेल्या अंगक्रिश रघुवंनेला पदार्पणाच्या सामन्यात काही खास कामगिरी केली नाही. पण, या सामन्यात त्याने शतकापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला. त्याने १२४ चेंडूत ९२ धावांची धमाकेदार खेळी केली. श्रेयस अय्यर १५ चौकार व २ षटकारांसह १६६ धावांवर खेळत आहे. तर सिद्धेश लाड १३ चौकारांसह १०४ धावांवर खेळत आहे.

# दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा!

## यु मुम्बाचा दबंग दिल्लीवर एकतर्फी विजय

**। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।**

कर्णधार सुनिल कुमारचा भक्कम बचाव आणि त्याला मिळालेली चढाईपटूंची चोख साथ याच्या जोरावर यु मुम्बाने प्रो कबड्डीच्या ११व्या पर्वातील मंगळवारी झालेल्या ३६व्या सामन्यात दबंग दिल्लीवर ३२-२६ असा विजय मिळविला. दबंग दिल्लीकडून आशु मलिक आणि बचावपटू योगेशचे प्रयत्न अपुरे पडले. यु मुम्बाने या विजयाने हंगामातील पहिल्या सामन्यात दबंग दिल्लीकडून झालेल्या पराभवाची परतफेड केली. पहिल्या सामन्यात दिल्लीने यु मुम्बावर सहा गुणांनी विजय मिळविला होता. मात्र, या वेळी यु मुम्बाच्या सर्वोत्तम सांघिक खेळापुढे त्यांची कामगिरी फिकी पडली. दिल्लीचा हा हंगामातील सातव्या सामन्यातील सलग चौथा पराभव ठरला, तर यु मुम्बा संघाने अखेरच्या सामन्यातून विजयाच्या मार्गावर आलेली गाडी रुळावर कायम राखली.

पूर्वार्धात दोन्ही संघांनी सावध खेळावर भर दिल्यामुळे खेळ संथ झाला होता. उत्तरार्धात मात्र यु मुम्बाने सामन्याला वेग दिला. उत्तरार्धाच्या पाचव्याच मिनिटाला लोण देण्याची संधी साधत यु मुम्बाने आघाडी वाढवली आणि ती कायम टिकवून ठेवकत एकतर्फी विजयावर शिक्कामोर्तब केले.

उत्तरार्धात यु मुम्बाने सुरुवातीलाच दिलेल्या लोणनंतर सामन्याला वेग दिला होता. मात्र, त्यानंतर मैदानावर आलेल्या दिल्लीचा कर्णधार आशु मलिकने आपल्या खोलवर आणि वेगवान चढायांनी मुम्बाच्या बचावफळीला आव्हान दिले. यातही आशु आणि सुनिल कुमार यांच्यातील स्पर्धा चांगलीच लक्षात राहिली. सुनिलने तीनवेळा आशुची पकड केली. पण, त्यानंतरही आशुच्या चौफेर चढायांनी दिल्लीच्या आव्हानातील हवा राखली होती.

अशा वेळी यु मुम्बाने राखीव खेळाडू म्हणून रोहित यादवला उतरविण्याची केलेली चाल चांगलीच यशस्वी ठरली. त्याच्या अष्टपैलू कामगिरीने यु मुम्बाने खेळावरील नियंत्रण कायम राखले. रोहितने एक गडी बाद करताना दोन बोनस गुण आणि दोन पकडी करताना महत्वपूर्ण पाच गुणांची कमाई केली. मुम्बासाठी हे पाच गुण खूप महत्वाचे ठरले. त्यामुळे सुनिलच्या बचावाला आणि मनजीतच्या चढायांना अचूक साथ मिळाली आणि मुम्बाचा विजय साकार झाला.

## २०३६मधील स्पर्धांच्या आयोजनासाठी ‘आयओसी’ला पत्र

# ‘ऑलिम्पिक’साठी भारताचा प्रस्ताव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

२०३६च्या ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धांच्या यजमानपदासाठी भारताने उत्सुकता दर्शवली असून त्यासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या भविष्यातील यजमान ठरविणाऱ्या आयोगाला इरादा पत्र सादर करण्यात आले आहे. भारतीय अधिकारी आणि ‘आयओसी’ मध्ये गेल्या काही महिन्यांपासून अनौपचारिक संवाद सुरू होता. अखेर भारताने यजमानपदाच्या दृष्टीने ठोस पाऊल उचलले आहे.

भारतीय ऑलिम्पिक संघटनेने १ ऑक्टोबर रोजी ‘आयओसी’ला पत्र पाठविल्याचे क्रीडामंत्रालयातील सूत्राकडून सांगण्यात आले. ‘भारतासाठी ही खूप मोठी संधी ठरू शकेल. आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती आणि देशभरातील युवकांचे सक्षमीकरण यासाठी ऑलिम्पिक यजमानपदाचा फायदा होऊ शकेल, असेही सूत्राने नमूद केले.

सरकारने २०३६ च्या ऑलिम्पिकचे आयोजन करण्याच्या त्यांच्या सरकारच्या आकांक्षेबद्दल सर्वप्रथम गतवर्षी भाष्य केले होते. तसेच त्यांनी या वर्षी स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरील आपल्या भाषणात ऑलिम्पिक आयोजनाच्या इच्छेचा पुनरुच्चार केला होता.

पुढील वर्षी ‘आयओसी’च्या निवडणुका होणार असून त्यानंतरच यजमानपदाबाबत निर्णय घेतला जाईल. भारताने ऑलिम्पिक आयोजनासाठी उत्सुकता दर्शवली असली, तरी सौदी अरेबिया, कतार आणि तुर्की या देशांचे आव्हान असणार आहे.



इरादा पत्र सादर केल्यामुळे, भारताने ‘अनौपचारिक संवादा’पासून यजमान निवड प्रक्रियेच्या ‘निरंतर संवाद’ टप्प्यापर्यंत प्रगती केली आहे. या टप्प्यात, ‘आयओसी’कडून संभाव्य यजमान देशांतील खेळांशी संबंधित प्रकल्पांच्या प्रगतीचा अभ्यास केला जातो. या प्रक्रियेच्या पुढील टप्प्यात कोणत्या वर्षीच्या स्पर्धेचे यजमानपद भूषवायचे आहे, त्यासाठी औपचारिक बोली सादर करणे आवश्यक असेल. याचे मूल्यमापन ‘आयओसी’ च्या भविष्यातील यजमान ठरविणाऱ्या आयोगाद्वारे केले जाईल.

### ‘आयओसी’ अध्यक्षांचा पाठिंबा

ऑलिम्पिक यजमानपदाच्या भारताच्या प्रयत्नांना ‘आयओसी’चे विद्यमान अध्यक्ष थॉमस बाख यांचा पाठिंबा मिळाला आहे. मात्र, बाख यांचा कार्यकाळ पुढील वर्षी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नव्या अध्यक्षांची भारताप्रति काय भूमिका राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

### अहमदाबादला पसंती?

भारताला २०३६च्या ऑलिम्पिकचे यजमानपद भूषविण्याची संधी मिळाल्यास ही स्पर्धा अहमदाबाद येथे आयोजित केली जाईल, अशी चर्चा आहे. भारताने यापूर्वी इतक्या भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन २०१० मध्ये केले होते. त्यावेळी नवी दिल्ली येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच १९५१ आणि १९८२ साली आशियाई क्रीडा स्पर्धाही नवी दिल्ली येथे झाल्या होत्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)